

मृगजळ
कोमल मानकर

# मृगजळ

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मृगजळ

(लघुकादंबरी)

## लेखिका :

## कोमल मानकर

**कोमल प्रकाश मानकर**

C/o नारायणराव तळवेकर

(विजय कॉलनी ) सिंन्दी रेल्वे . त. सेलू जि. वर्धा , PIN - 442105

ईमेल :- Mankar123komal@gmail.com

भ्रमणध्वनी क्रं :- 9011071641

WhatsApp no :- 9145764687

Blog name - komaldaze.wordpress.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP :

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : ५ सप्टेंबर २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

या कथे मधील सर्व पात्रे घटना काल्पनिक आहेत जर चुकून
याचा कुठे संबंध आलाच तर तो  निव्वळ योगायोग समजावा.
यात कुणाच्या भावना दुखावण्याचा कोणताही उद्देश नाहीच.

## मनोगत

“मृगजळ” ही कादंबरी वाचकांसमोर ठेवताना मला अतिशय आनंद होत आहे.

तशी मी पुस्तकाच्या भावविश्वात रमलेली  तरूणी.  वाचनाचं वेड फार जुनं.. आणि पुस्तकांसोबत माझं नातं ते फार अगत्याचं. नजरेला पडेल ते आणि हाताला लागेल ते वाचतं सुटायचं. अधिकतर माझ्या वाचनाचा कल कादंबरीकडे होता. त्या कादंबरीचा नायक एखादी महान इतिहास घडून गेलेला व्यक्ति असायला हवा  असं मला वाटायचं....

माझ्या बावीस वर्षाच्या काळात माझ्या घरातला टिव्ही कधी ऑन राहिला असेल तर नवलचं!

मला आठवतं मी सहावीत असेल आणि घराशेजारीच लायब्ररी होती. कार्ड काढलं आणि मी तीन चार दिवसातून नियमित जायला लागली.... सुरूवात माझ्या वाचनाला चंपक नावाच्या बालमासिकातून झाली. सातवीत असताना रामायणाचे आठही खंड मी वाचून  काढले. सर्व धर्माच्या अभ्यासासाठी  मी प्रत्येकांचे धर्म ग्रंथ धुडाळीत असते. शाळेचा अभ्यास मी कधी करायची हे मला आताही सांगणं अवघडच. सावरकरांचे काळे पाणी, साने गुरूजीचे श्यामची आई, गोप्या, पत्री हे वाचून काढलं आठवीत असताना. दरम्यानचा काळात  चेतन भगतच्या दोन नोवेल

हाती लागल्या थ्री मिस्टेक ऑफ माय लाईफ, one night @ the call center आणि तेव्हा पासून चेतन भगत youth icon असल्याची जाणीव झाली..

दहावीचं वर्ष पुढ्यात येऊन ठेपलं. अभ्यास एके अभ्यास दुसरं काहीच नाही.. दहावीचं वर्ष असतांना मी माझ्या आयुष्यात बोर्डची परिक्षा पहिल्यांदाच देत होती ह्याचंही मला दडपण नव्हतं. एवढेच टक्के मिळावे ह्याची हुकूमत मी स्वतःवर गाजवली नाही. जे होईल ते पाहिल्या जाईल म्हणून माझा ओढा मात्र लायब्ररीकडेच.. नववीत असतांना मी हर्षदा भुरे लिखित लुई ब्रेल ह्याचं आत्मचरित्र वाचलं. “दृष्टिदाता” ! त्या कांदबरीने मला पछाडून टाकलं ते कसं? सांगते... नववीत असताना माझ्या हातात ती कांदबरी पडली हातात आली तेव्हाच त्या रात्रभर जागून दुसऱ्यादिवसपर्यंत मी वाचून काढली.

आणि दहावीचे बोर्डचे पेपर सुरू असतानाही मी रिपीट रिपीट तीच कादंबरी वाचत होती.. लुई ब्रेल कसे जगले, त्यांचं जीवन अंध असूनही ते इतरांसाठी डोळस कसे ठरले ह्याच गहनतेत मी.. एकूण अठरा वेळा ती कादंबरी मी घरी आणून वाचली. एकदा लायब्ररियन मॅंडम मला म्हणाल्या , “कोमल एकदाच बुक घेऊन पुर्ण वाचा. परत परत नेऊ नका..” माझ्या मनाला त्याचं बोलणं लागलं.

सायन्सला अँडमिशन घेतली अकरावीला आणि तेव्हा पासून लायब्ररीत जाणंच बंद केलं. गेले तरी माझी पाऊलं त्याच कपाटाच्या दिशेने पडायची. आणि आपूसकच दृष्टिदाता कादंबरीवर नजर पडायची.. एखाद्या व्यक्तिपेक्षा मी त्या

पुस्तकावर प्रेम केलं असावं.. विकत घ्यायला मी खुप बुक्सस्टॉल शोधले पण आजही ती बुक मला नाही मिळाली.

पुस्तक वाचण्याची आवड कधी सुस्थ बसू देत नव्हती... कपडे घेण्यापेक्षा मी त्याच पैश्यांचे पुस्तके घ्यायला लागली स्वतःच्या मिळकतीच्या पैश्यातून मला जे पुस्तक वाचनालयात वाचायला नाही मिळाली ती पुस्तके मी घेतली. “एक होता कार्व्हर” वीणा गवाणकर ह्यांचे. एपीजे अब्दुल कलाम ह्यांनी लिहिलेले “अग्नीपंख”.. “स्टील फ्रेम” फारूक नाईकवाडेचे. काही पुस्तक व्यक्तिमत्त्व घडवण्याचे काम करतात. त्या पुस्तकातलेच माझे काही आवडते पुस्तकं “कोल्हाट्याचे पोरं” किशोर शांताबाई काळे ह्यांचे. लेखक दिवगंत झाले पण माणूस घडवणूकीसाठी स्वतः च्या लेखणीतून अनमोल खजिना आपल्याला बहाल करून गेले.. “गरूड झेप” भरत आंधळे लिखित. एक तरूण वयाच्या एकवीसाव्या वर्षी आएएस अधिकार बनतो आपल्या परिस्थितिचा सामना करत. ही काही कमी अभिमानाची गोष्ट नाही

मी अन्सर शेख सरांबद्दल बोलत आहे.. स्वतः अधिकारी बनून त्यांनी आपल्या कमी वयातच खूप महत्त्वाची कामगिरी बजावत “युपीएसी मी आणि तूम्ही” लिहिले. “ययाती” वि. स. खांडेकरांनी लिहिलेले मी वाचले पण अजूनही मला ययाती राजाचे काही प्रसंग कोड्यात टाकणारेच वाटतात...

“जातीयतेचे निर्मुलन” डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित. आणि महात्मा जोतिबा फुल्यांचे “शेतकऱ्यांचा असूड” माझ्या वाचण्यात आलेल्या पुस्तकाबद्दल जेवढं

लिहावं तेवढं कमीच आहे... सुधा मुर्ती आणि तसलिमा नासरिन माझ्या आवडत्या ह्या दोन लेखिका वाईज अँण्ड अदर वाईज कथासंग्रह मुर्तींचा वाचण्यासारखा आहे. नासरिन ह्या बंगाली लेखिका ह्यांच्या “लज्जा”आणि “नष्ट मयेरे नष्ट गद्य” नोवेल स्त्री विषयावर सखोल अभ्यास करण्यासाठी नक्कीच पुरक ठरतात..

अलीकडे उत्तम कांबळे ह्यांची “आई समजून घेतांना” कांदबरी वाचली... श्यामच्या आईसोबत आणि गोर्कीच्या आईसोबत नक्कीच अक्कांची तुलना करणं म्हणजे आव आणणं होईलं.... हा माझा वाचनाचा प्रवास निरंकार थांबा न घेता सुरूच राहिलं...

आता माझ्या लिखाणाबद्दल बोलायचं झाल्यास.. मी लिखाणाला सुरूवात केली २०१५ पासून बारावी झाल्यानंतर पॉलीच्या पहिल्या वर्षाला असतांनी. माझी “आहट ह्लदयाची” ही पहिली कविता पुण्यनगरीला प्रकाशित झाली. आणि तिथूनच माझ्या लिखाणाला गती प्राप्त झाली.

मी लिहिलेले लेख कविता पुण्यनगरीचे संपादक प्रकाशित करू लागले.. इमेलवर वाचकांच्या भरभरून आलेल्या प्रतिसादाने मी कथा लिखाणाला सुरूवात केली. शिवाय वाचकांच्या आवडीनिवडी जाणून त्यांना काय वाचायला आवडेल हे समजल्यावर बहुतेकांना प्रेम विषयात जास्त रस दिसून आला.

प्रेम विषयावर लिहायला सुरूवात तर केली पण वास्तविकतेचा शोध घेत लिखाण वास्तविकतेला धरून लिहू लागली... नंतर कल्पना करून लिहणं मला योग्य वाटू लागलं पण कल्पना ही सातत्यातून उतरत असते हे ही तेवढचं आणीबाणीचं नाही का!

पुण्यनगरी, तरूण भारत, देशोन्नती, लोकमत, लोकशाही वार्ता, दै. बदलता महाराष्ट्र, दिव्य मराठी वर्तमानपत्र, मासिक, साप्ताहिक शिवाय दिवाळी अंकातून लेख प्रकाशित होत असतात..

२०१७ च्या वर्ल्ड सामना दिवाळी अंकात "किनाऱ्यालगतच्या कातरवेळी" ही प्रेमीयुगलावर कथा छापून आली वाचकांच्या सारख्याच प्रतिक्रिया येऊ लागल्यात ही कथा वास्तविक आहे का? खुप छान होती कथा अनामिका खरचं जग सोडून गेली का? आलोकच नंतर काय झालं?

मला मराठी कांदबऱ्या वाचायला जेवढ्या आवडतात तेवढच माझ्या लिखाणात मी पात्रांना फोरेन नाव देते. बहुतेकांना वाटतं की मी इंग्रजी नोवेलचा कथा विभाजनाचा मराठीत अनुवाद करते.

मला माझ्या कथेत नाविन्य पाहिजे असते, काहीतरी नवीन आणि फोरेन नाव मला पात्रांना द्यायला आवडतात त्यांच्यावर एका नवीन कथेचा उलगडा होत जातो..

“द् लॉन्ग डार्क” विशिष्ट काळोखाने  घेरलेली गुढ प्रेमकथा.... “द् लार्वे - हरवलेला देवमासा” हे कथेचं जग स्वतः भोवती एक वलय निर्माण करतं कधी कधी आपण ज्या कल्पक्तेने पात्रांना हाताळतो की ती एवढी जवळची होऊन बसतात  आपण त्याच्या कल्पनेत रममाण होतो.

मृगजळ लिहितांना  मृत पात्रांला जिवंतपणाचं स्वरूप देणं मुश्कीलीचं झालं. आराध्या मरते आणि आशना  जगते... तिचंही  आलोकवर जिवापाड प्रेम... श्री शालेय जिवणापासून ऋतुजाच्या प्रेमात पडतो पण सांगायला तिला घाबरतो. नियतिला दोघांना एकत्र आणून अलग करायचं असतेच. मृग  अवकाशात एकत्र ऐतात संपुर्ण आकाश ज्याला कुठेच अंत नाही जे infinite आहे... असं जंजाळ एकात दुसरं विसावलेलं. उजेडातही  काळोख टाटून आला की वर्षा येण्याचे संकेत देणारं... मृगजळच!

वाचकांना ही कादंबरी आवडेल अशी आशा व्यक्त करते...

## ऋणनिर्देश

सर्वश्री मी सुनील सामंत सर, ईसाहित्य प्रतिष्ठान टिम ह्यांची आभारी आहे त्यांनी कादंबरी प्रकाशनाला होकार दिला..

हे पुस्तक तर त्यांचंच आहे... माझ्या पहिल्याच ह्या कादंबरीला त्यांच्या कलाकृतीची अगत्यशील साथ लाभली. आभार तरी कोणाचे, कसे आणि किती मानावेत!

नाव लिहीतांना संपायची नाहीत... मी ह्या सर्वांची फार ऋणी आहे... धन्यवाद!

कोमल मानकर

C/o नारायणराव तळवेकर

(विजय कॉलनी ) सिंन्दी रेल्वे . त. सेलू जि. वर्धा , PIN - 442105

ईमेल :- Mankar123komal@gmail.com

भ्रमणध्वनी क्रं :- 9011071641

WhatsApp no :- 9145764687

Blog name - komaldaze.wordpress.com

अर्पणपत्रिका

प्रेम पाखरांना स्मर्पित ...



# मृगजळ

भाग - १

काळोख गर्द पसरलेला त्या अंधारमय सडकेवरून वाहनाची रेलचेल जरा जास्तच होती. मुसळधार पाऊस रस्त्यांच्या कडेला असलेली गंटारे नाल्या तुडूंब भरलेल्या. श्री ला समोरचं काचेतून काहीच नव्हतं दिसतं काचावरही सततची न थांबता पडणारी पाऊसाची धार तो वैतागून गेला.

आज पहाटे पासून पाऊसाची रिपरिप सुरू होती. तो असा अचानक वेग धारण करून तांडव करेल ह्याची पुर्वकल्पना ऋतुजाला पण नव्हती म्हणून ती ऑफीस मधून आपली सर्व काम आटोपून जरा उशिराच घरी जायला निघाली..

दहा आटोला तिने समोर हात देऊन थांबवण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थच! एकही आटो थांबायला तयार नव्हता... आता काय करावं घरी पोहचणं होणारं की नाही माझं.... ह्याच विचाराने ऋतुजाचा जीव त्या पाऊसात खालीवर होत होता... वारा वेग धारण करून आडवा तिडवा सरीचा शिरकावं करतं होता तसं ऋतुजाच्या मनात प्रश्नाची कालवाकालव होतं होती...

घरी फोन तरी तेवढ्या पाऊसात कसा करणारं आधीच चिप्पप.... भिजलेली होती ती कुठे एखाद्या रेस्टोरेंट मध्येही जाऊन विसावा नव्हती घेऊ शकत... सैरावैरा नजरेने ती इकडेतिकडे शोधाशोध घेतं उभं रहायला जागा धुडाळतं होती तर तिला आडोशाला उभ्या असलेल्या पुरूषांचीच गर्दी दिसतं होती.... तिच्या मनाला वाटलं तिथं थांबून आटोही मिळणार नाही.

असु देत आता! रहावं इथेच उभं म्हणून ती येणाऱ्या आटोला हात देऊन थांबवीत होती. पण, कोणताच आटो ती रहाते त्या एरिया मध्ये जायला तयार होत नव्हता कारण तिथून तिचा एरिया अर्धा पाऊण तासाच्या दुरीवर होता.

ऋतुजाला दुरवरून एक कार येतांना दिसली तिला वाटलं आटो थांबायला तयार नाहीच आहेत. काय करावं?? ह्या कारला हात देऊन बघते आपल्या एरियाकडे जाणारी असेल तर बरंच होईल. मनात धास्तावलेलीच होती ऋतुजा पण काय करणार अर्धा तास जास्त झाला होता ती उभी होती काही option नव्हतं तिला घरी जायला..

रात्रीचे आठ वाजले होते... श्री वेगात कारने घराकडे जात होता त्याला समोर गेल्यावर भास झाल्यासारखं वाटलं... कोणी तरी लेडिज आपल्याला लिफ्ट

मागते आहे... त्यांने कारची स्पीड स्लो करतं मागे वळून बघितलं... तिथे त्याला अंधारात उभी असलेली तरूणी दिसली....

त्याने आपली कार मागे घेतली..... ऋतुजा समोर येऊन कार थांबवत त्याने काच खाली केला...

ऋतुजा काचाजवळ जातच त्याला म्हणाली,

“आपण बेजनवाडीला चाललात का?”

बेजनवाडी नाव ऐकताच क्षणभर सुटकारा घेतं श्री मनातच म्हणाला... इथून किती दुर आहे. ह्या मुलीला पण तिथचं जायचं होतं का?? पण, त्याने ती रात्रीची वेळ आणि परिस्थिति बघून जास्त विचार न करता कारचा दरवाजा उघडला..

त्या पाऊसाने चिंब भिजलेली ऋतुजा श्री ला म्हणाली,

“मी चिंब भिजलेली आहे बसू शकते ना शिट वर.....”

श्रीने होकारार्थी मान हलवली तशी ती त्याच्या बाजूच्या शिटवर बसली...

श्री तसा संस्कारी सुसंस्कृत घराण्यातला मुलगा... लहानपणापासून त्यांच्यावर घरून चांगलेच संस्कार पडले नेहमी अडचणीत मदत करणारा परस्त्रीचा सन्मान करणारा स्त्री सन्मानाला ठेच न पोहचू देणारा हा श्री...

ऋतुजा त्यांच्या बाजूला आपलं अंग चोरून बसली. श्रीने अद्यापही तिच्याकडे मान वळवून बघितलेलं नव्हतं. त्याने कमी आवाजात गाणे सुरू केले... एवढ्या पाऊसातही श्रीने गाडीतला एसी मात्र बंद केला नव्हता.. आणि ऋतुजा ती बिचारी थंडीने गारठून गेली तिला वाटलं कार मधून उतरून तरी जावं ह्या महाशयाला कोण सांगेल एसी बंद करायला...

उगाच बसू दिलं म्हणेल... तिची हुरहुर वाढली अंगाला काटे आले होते. चुकून श्रीची नजर तिच्यावर पडली आणि तो मनातच म्हणाला,"कुठे तरी बघितल्यासारखं वाटते पण कुठे??"

तो विचाराचा तद्रीत पडला तसं त्याला जाणवलं ऋतुजा थंडीने अकडून राहिली... त्याने एसी बंद करतच तिला म्हटलं, I Am sorry for that..... माझं लक्ष नव्हतं तुमच्याकडे Relax.... हं असं म्हणतं श्रीने आपल्या अंगातला कोट काढत तिच्या समोर ठेवतं म्हणाला,"हे घाला ऊब मिळेल तर जरा बरं वाटेल...."

नाही म्हणावं पण, तिला वाटलं त्याचा अपमान होईल म्हणून तिने थँक्यु म्हणतं कोट कसातरी स्वतःभोवती लपेटून घेतला...

श्री आपल्या भुतकाळात हरवून गेला त्याला त्याचा भुतपुर्व आठवणी त्याचा जीवनातल्या कशा मिटणार होत्या.... तो पाचवी पासून दहावी पर्यत वर्गात एकाच मुलीवर प्रेम करायचा तिला चोरून बघायचा तिच्या नकळतच प्रेम केले त्याने तिच्यावर आपल्या प्रेमाची चाहूल तिला न लागू देता...

ती होती ही त्याच्यासाठी स्वप्नातली परी. लक्ष वेधून घेणारी साधी रहाणी तिची त्याला खुप आवडायची..... गोरवर्ण चंद्रासारखा तिचा तो लोभस मुखवटा त्याचा नजरेत आजही कैद केलेला होता!

तिचं नावही ऋतुजा त्याच्या ओठातच रेंगाळत होतं ती हिच असावी का ही शंका त्याच्या मनात येऊन गेली... कारण व्यक्ति कितीही मोठा झाला तरी चेहरा तोच असतो.

तिला ही जरा वाटायचं ह्याला कुठेतरी बघितलं पण तिने चक्क त्याला आठवायलाच स्वतः ला नकार दिला....

आपल्या मनातील संदेह दुर करण्यासाठी म्हणून त्याने चाचरतच तिला विचारलं,"तुमचं नाव काय?"

....... तिने हसतच उत्तर दिलं

“माझं नाव.... ऋतुजा!”

ऋतुजा नाव ऐकताच त्याच्या बॉडीला शॉक बसावा आणि झिनझिण्या लागाव्या असं शहारलं त्याने गाडीला ब्रेक मारला.... जाणून नाहीच! काय होतयं आपल्या सोबत हे आणि का?? ह्या कोड्यात तोच फसला होता....

गाडीला असं अचानक ब्रेक का दिला?? म्हणतचं ती त्याच्याकडे बघू लागली. खिशातून रूमाल काढत ऐवढ्या पावसात तो घामाच्या धारा पुसत होता..

“तुम्ही ठिक आहात न....”जरा काळजीच्या स्वरात तिने श्री ला विचारले...

हो.... म्हणतं त्याने आपली गाडी सुरू केली गळयाला बांधलेला टाय एका हाताने सैल करत तो म्हणाला,

“माझं घर आलय.... तुमचं इथून पंधरा मिनिट दुर आहे!”

तिला वाटलं आता ह्याचं घर आलं तर मला हे सोडून कसे देतील... नाराजीने ती म्हणाली,

“ठिक आहे मी आटो बघून घेईल नाहीतर जाते पायी चालत तुम्ही थांबवून द्या इथेच.”

श्री ज्या मुलीवर प्रेम करायचा ही तिचं त्याची ऋतुजा होती... त्याला ह्याची आता पुर्णपणे खात्री बसली आपलं प्रेम म्हणून आणि माणुसकी ह्या नात्याने तो एका स्त्रीला एवढ्या रात्री भर पाऊसात एकटीला वँन मधून उतरून जायला कसा सांगेल.. त्याचं घर आलं म्हणून हे नक्कीच त्याच्या स्वभावगुणात नव्हतं... तो ऋतुजाला म्हणाला,”मी देतो तुम्हाला सोडून... घरपर्यत एवढ्या पाऊसात काय मिळणार तुम्हाला रात्रभर माझ्या घरासमोर उभं रहावं लागेल आणि ते मला कसं पटणार? हवं तर तुम्ही आज रात्र माझ्या घरी थांबू शकता उद्या पाऊस कमी झाला की देतो सोडून घरी आई आहेच माझी...”

त्याचं नॉनस्टॉप बोलणं ऐकून ऋतूजा त्याला हसतचं म्हणाली, “नको नको द्या मला घरीच सोडून...”

तिचं बोलणं झाल्यावरही ती गालातल्या गालात हसतच होती.. तिला असं पहिल्यादा हसतांना बघून श्री ही तिच्या हसण्यात सहभागी झाला....

तिने आपल्या बँग मधून फोन काढला ती फोन बघते तर तिचा भाऊ आशुतोषचे पंधरा मिसकॉल दहा मँसेज बघून ती हैरान झाली... आणि डोक्यावर हात ठेवतच म्हणाली,”दादापण ना किती काळजी करतो ह्या पाऊसाच्या पुरात त्याची बहिण वहात नसती गेली, आता घरी जाऊन खुप रागवणार हा.....”

तिचं बोलणं ऐकतचं श्री म्हणाला,”तुला मोठा भाऊ आहे का? नावं काय त्याचं??”

“हो आशुतोष इनामदार...... दोन वर्षांनी मोठा आहे माझ्यावर त्याचीच घरात दादागिरी चालत असते...”

तिने हसतच त्याला सांगायला सुरूवात केली.... श्री च्या चेहऱ्यावर नाराजीचे सावट पसरले होते. ते नाव ऐकून कारण ऋतुजाचा भाऊ श्री चा कधीकाळचा रूममेट बेस्ट फ्रेन्ड आणि नंतर शत्रु झाला होता.

काही गैरसमजूतीमुळे.....

भाग - २

ऋतुजाचं घर आलं.... घराच्या समोर कार पोहचताच ती श्री ला म्हणाली, “थांबवा.... आलय माझं घर very very thanx तुम्ही नसते आलात तर अद्यापही मी तिथेच थंडीत कुडकुडत बसलेली असती सरीना झेलत....”

तिला गोड स्माईल देत,”सांभाळून जा!” एवढच म्हणतं त्याने गाडी सुरू केली.....

गेट उघडून आत शिरतच ऋतुजा स्वतःशीच पुटपुटली,”संभाळून जा म्हणे..... हं ह्या वाक्याची गरज तर मला नसून त्यांना होती...”

ऋतुजाचे घरात पाऊल पडताचं,

“काय हे ऋतुजा कुठे थांबली होती एवढ्या पाऊसात अंग आशुतोष कधीचा कॉल करतोय तुला रिसिव्ह करून सांगायच तरी, आम्ही किती टेन्शन मध्ये होतो इकडे माहितीये तुला??”

किचन मधून स्वयंपाक आटोपून हॉल मध्ये प्रवेश करतच तिच्या आईने आपलं बोलणं सुरू केलं...

“अंग आई आली ना आता घरी मी जाम भुक लागली आहे मला काहीतरी खायला दे! पोटात कावळे ओरडून राहिलेत माझ्या....”

ऋतुजा बाहेरून येऊन थकून गेली होती सोफ्यावर पडतचं ती आईला बोलत होती..

“आता आपण सर्व जेवण करून घेऊ.... बेटा तू आता आमच्या सोबत जेऊनच घे!”

तिचे बाबा रूमच्या बाहेर येत केशवराव तिला म्हणाले आणि त्यांनी लगेच जेवणासाठी आशुतोषलाही आवाज दिला.....

भाग - ३

तिकडे श्री घरी जाऊन बिछान्यावर पडला... आईने त्याला जेवण करायला आवाज देऊनही तो बेडवरून उठला नाही... सारखा ऋतुजाच्याच विचारात मग्न होता. त्याला कळत नव्हतं आपल्या सोबत का होत आहे असं?? आपण कोणत्या दुनियेत जगत आहोत?? आज तीच माझी ऋतुजा जिच्यावर मी प्रेम केलं तिला मी घरी ड्रॉप करून दिलं. पण, एवढा वेळ सोबत घालवून आपण तिच्या समोर आपल्या मनातली भावना व्यक्त नाही करू शकलो... नाही तिला असं सांगणार कसं आपण?? की, मी तुझ्यावर प्रेम करतो ती तर चक्क विसरूनही गेली आपण दहावी पर्यत एकाच वर्गात होतो..

तिला खरचं आठवत नसेल का? नाही तिने आठवूण घेण्याचा मुद्दामहून प्रयत्न नसेल केला....

माझं प्रेम हे एकतर्फीच राहिल शेवटपर्यत माझ्यासाठी कारण, मला वाटतं ऋतुजा माझी कधी होऊच शकणारं नाही... ( श्री मनातल्या मनात कोसत होता स्वतःला. )

तीन चार वर्षाआधी बीटेक करण्यासाठी जेव्हा श्री दिल्लीला गेला होता तेव्हा त्याच्या शहरातल्या मित्रासोबत ऋतुजाचा भाऊ आशुतोष त्याचा रूममेट म्हणून तिथे पाचसहा महिन्याने राहायला आला... आशुतोष हा मेडिकलचा स्टुडन्ट

आणि श्री हा इंजीनियरिंगचा स्टूडन्ट तरी दोघामध्ये मस्त गट्टी जमली.... एका शहरातलेही होते ते दोघं. बाकी तीन मित्र दुसऱ्या शहरातले. असे पाच मित्र एका रूममध्ये रहायचे.. काही दिवसानं श्री आणि आशुतोषला जाणवून आलं आपली गाण्यापासून कलरपासून खाण्यापर्यंतची चॉईस किती सारखी आहे... टी-शर्ट घ्यायला दुकानात गेल्यावर जे शर्ट आशुतोषच्या पसंदीला यायचं तेच श्रीला... रूममधले तिघ मित्र जयेश, रंजित, पराग ते तर ह्या दोघाना गर्लफ्रेंड बॉयफ्रेंड म्हणून चिडवायचेही...

वर्षाचा शेवट शेवट श्रीच बीटेक संपत आलं तेव्हा झालं काय.... पराग एका मुलीच्या प्रेमात पडला ती मुलगी आशुतोषचा मेडिकल कॉलेज मधली त्याची क्लासमेटच त्याच्याच रुमच्या समोर तिची चार फ्लोरची इमारत होती. ती मुलगी जाता येता सारखी परागच्या नजरेत भरायची तो तिला रूममधूनबघत रहायचा ती बाहेर कधी पडते म्हणून.... ती बाहेर पडली की हा सारखा तिचा जाण्यायेण्यावरचा पहारा ठेऊन बसलेला असायचा...

तिचं नाव होतं आराध्या.... ती दिसायला छान आहे म्हणून पराग तिच्या सौदर्याला भुलला पण, तिला कळलं आपला क्लासमेट आशुतोष इथे समोरच रहातो.. ती त्याच्या सोबत हळूहळू ओळख पटवण्याचाही प्रयत्न करते.. मित्र म्हणून तो तिचा संपर्कात असतो ती मात्र आशुतोषचा प्रेमात पडते.. कॉलेजला जाता येता ती त्याला लिफ्ट देते... परागला वाटते आशुतोष आणि आराध्या मध्ये काही चालूच आहे.. तो तसं त्याला डायरेक्ट विचारू शकत नाही.. आपल्या मनातील भावना तो कुणाच

जवळ व्यक्त करू शकतं नाही. जयेश तो तर बाहेर असायचा कॉलेज पार्ट टाईम जॉब ह्यातच त्याचा वेळ निघून जायचा. रूमवर येऊन तो कधीकधी न जेवता झोपी जायचा.. रंजित त्याला तर पुस्तकाच्या पलीकडचं जग ठाऊकच नव्हतं म्हणावं लागेल... श्री जवळ वेळ असायचा दिवसभर कॉलेज मधून आल्यावर चार नंतर तो रूमवर पडूनच आपला पुर्ण वेळ स्टडीला दयायचा.. पराग कॉलेजवरून आल्यावर त्याला एकदा वाटलं आपल्या मनात साचलेला सर्व गाळ आपण आज श्री समोर उघड करावा. तो नक्कीच मला समजून घेईल म्हणून पराग आपली कॉलेजची बँग खांद्यावर उतरवून ठेवत श्री जवळ जात त्याला म्हणतो, “श्री मला तुला काही सांगायचं आहे....”

त्याच्याकडे बघत श्री म्हणतो,”हं सांग ऐकतो आहे....”

....

......

“मी.....”

“हं समोर बोल....” श्री परागला म्हणतो....

“मी..... एका मुलीचा प्रेमात पडलो.”

घाबरतच त्याने श्री ला बोलून दाखवलं....

“काय वेड विड लागलं का तुला? की प्रेमाचं भुत झोमलं.... कोण ती?” त्याला रागवत आणि दटावतच समोरचा प्रश्न श्रीने केला...

“ती आराध्या... आपल्या रूम समोरची इमारत.”

आपल्या रूम समोरच्या इमारतीत कोणी आराध्या रहाते हे तो पहिल्यादा परागच्या तोंडून ऐकत होता श्री मुलीपासून खुप लांब होता दरम्यान चा काळात पाचवी सहावी पासुन आणि नंतरही त्याच्या मनात घर करून होती ती ऋतुजा...

“मग सांग ना तिला जाऊन....”

......

......

......

......

दोन तीन मिनिट स्तब्ध राहून पराग म्हणाला, “अरे ती माझी नाही होऊ शकत.”

परागच्या मनात शंका होतीच की आशुतोष आणि आराध्या मध्ये काहीतरी सुरू आहे. तो तसचं श्री ला बोलला. पण, पराग समजतं होता तसं त्यांच्यात काहीच नव्हतं.

“तिच्यावर दुसरा कोणी तरी प्रेम करतो....”

“तुला कसं माहिती?? “ तो कोण आहे हे विचारण्या ऐवजी श्री ने त्याला विचारले.

“बघितलय रे मी स्वतः च्या डोळयांनी......”

रडवल्या स्वरात मनात खेदाची भावना उत्पन्न करून पराग बोलला.

“ओहहहहहह मग जाऊ दे ना. तिच्या सुखाची आस धर. ती त्याच्यासोबत खुश आहे ना! ह्यात तू आनंद मानून जग....”

“पण, मला तिला सांगायच आहे.....”

“तुला जे वाटते ते कर.....” त्याच्यावर चिडतच श्री म्हणाला.

परागने आपल्या बँग मधून रजिस्टर काढलं त्याचं पेज फाडलं आणि लिहायला बसला....

त्याची ही activity बघून श्री वैतागतच त्याला म्हणाला, “हे काय करतो आहे आता....”

“चिठ्ठी लिहितो आहे तिला......” चिठ्ठीवर प्रिय आराध्या लिहतचं तो उद्गारला.

त्याच दिवशी आराध्या आशुतोषला बागेत नेऊन प्रपोज करते. आशुतोष तिला प्रपोज स्विकारायला काही अवधि मागतो.

परागची चिठ्ठी लिहूनही पुर्ण होते.. पण, तो ती चिठ्ठी स्वतः तिला द्यायला तयार होतं नाही.. तो हे काम श्री ला सांगतो.

“श्री अरे तू मित्रासाठी एवढं नाही करू शकतं का? प्लिज माझ्यासाठी. ती येतच असेल तू बाहेर जाऊन उभा रहा ती आली की दे तिला ही चिठ्ठी...”

आराध्या एकटीच त्या दिवशी आपल्या कारने येत होती आशुतोषला काही काम होतं म्हणून तो कॉलेज मध्ये थांबला होता....

आराध्याची कार येताना दिसली तसा श्री समोर जाऊन उभा राहिला ती कारमधून उतरताच त्याने ती चिठ्ठी आराध्याला देत म्हटलं,”हे चिठ्ठी तुझ्यासाठी....”

ती त्याच्याकडे एकटक बघतच होती तिला मनात वाटलं हा तर आशुतोषचा रुममेटस ना! ती म्हणाली,”आपले नाव??”

“श्री....” असं म्हणतच तो तिथून वेगाने रूम मध्ये आला..

आराध्या आपल्या बेडरूममध्ये जाऊन फ्रेश झाली आणि ती चिठ्ठी वाचायला हाती घेतली.... तिला वाटलं नव्हतं आपल्या वर एवढं प्रेम करणारा कोणीतरी आहे.

क्षणभर तिच्या डोळयातून आसवाची गळती होत होती.... पत्राच्या खाली परागने तुझ्यावर प्रेम करणारा मी एकतर्फी प्रेमी असं टाकल्याने तिला वाटलं श्री तिच्यावर प्रेम करतो. आणि ते पत्र तिला श्री ने दिल्याने तिला हे आशुतोषला सांगायचच होतं म्हणून ती ताबडतोब कॉल करून एका कॉफ़ी शॉप मध्ये आशुतोषला भेटायला बोलवते त्याला ते पत्र दाखवून ती सांगते “हे पत्र मला श्री ने दिलं....”

आशुतोषच्या पायाखालची जमिनच सरकते. त्याचा विश्वास बसत नाही. श्री असं करू शकतो ह्या गैरसमजूतीतच तो कुणाचं एक न ऐकून घेता त्याच रात्री रूम सोडून जातो....

भाग - ४

आशुतोषने रूम तर सोडली आता जायचं कुठे म्हणून एक रात्र तो हॉटेल वर काढतो... आराध्या त्याला कॉल करून करून त्रस्त होते. आशुतोषलाही काहीच सुचत नाही तिला हो म्हणावं की नाही नेमक करावं काय विचारची ससेहोलपट झालेली...

त्या रात्री तो रात्रभर झोपला नाही... श्री पण त्याला सारखा कॉल लाऊन बघत होता पण, त्याला प्रतिउत्तर मिळत नव्हते आशुतोषने त्याचा नंबर ब्लेकलिस्ट मध्ये टाकला.

दुसऱ्यादिवशी मित्राच्या मदतीने त्याला कॉलेज जवळच रूम मिळाली... तिथून तीन महिन्यांनी त्याने आराध्याला भेटायला बोलवले एका कॉपी शॉपमध्ये ती आली.... तिने जीन्सवर सैलसर लिंबू कलरचा टॉप घातला होता. तर आशुतोषने नवीनच घेतलेला डार्क हिरवा टी शर्ट घातला होता. त्याच्या पिळदार दंडांवर तो फ़िट बसला होता.

दोघेही असे बाहेर कॉपीशॉप मध्ये एकांतात तीन महिन्यांनी भेटत होते... बाहेर पाऊसाचं वातावरण होतं. मेघ एकत्र जमले. सरीने बरसायला सुरूवात केली. तसा आशुतोष आराध्याचा हात पकडून कॉपीशॉपच्या आडोशाला घेऊन गेला. पाऊस मुसळधार येत होता. त्या दोघाना भिजवत होता.

जोराच्या विजा कडकडायला सुरूवात झाली...

आराध्याला विजांची खुप भिती... एक जोराची विज कडाडली आणि आराध्याने भिऊन आशुतोषचा शर्टला गच्च पकडूनच घेतले. लहानशा बाळासारखी ती आशुतोषला घट्ट पकडून होती. तिचे ओले झालेले केस आशुतोषचा गालाला स्पर्शुन जातं होते. ओठावरून सळसळतं पाणी आणि भिजलेल्या पापण्याचं चुंबन घ्यावं असं आशुतोषचा मनात आलं. त्याने तिला घट्ट बाहुपाशांत जकडण्यासाठी हात फ़ैलावले.

पण पुन्हा ढग गडगडायला लागले त्या आवाजाने भानात येऊन आपण कुठे उभे आहोत ह्याची प्रत्यक्षात जाणीव होताच आराध्या आशुतोष पासून दुर झाली... ती आशुतोषला म्हणाली,"आशु तुझा होकाराच्या मी किती प्रतिक्षेत राहू??"

आशुतोष तिच्यापासून नजर लपवत म्हणाला,"तुला वाईट वाटेल पण, मी तुझा एक मित्र होतो. त्या पलीकडे मला कुठल्याही नातेसंबंधात अडकवू नको प्लिज....."

पावसाच्या बरसणाऱ्या सरीच्या आवेशात आराध्याचे अश्रूही सळमिसळीत झाले होते.....

पण ते तिच्या डोळयातले अश्रू त्याला दिसतं नव्हते.... ती काही न बोलता तिथून जायला निघाली....

आशुतोषने लगेच तिचा हात पकडुन घेतला.....

“सोड माझा हात आशु.....”

त्याला खरचं प्रेमाच्या बंधनात अडकायचं नव्हतं पण, तो तिला होकारही देऊ शकतं नव्हता,

“घरी जाऊन तू खुप रडणार हो ना आराध्या.....”

“तुला काय त्याचं..... एवढं, नाही म्हणून माझं मन तोडलं ना! मिळालं मला माझं उत्तर...”

“आराध्या मित्र म्हणून रहा ना!”

“अरे पण मी प्रेम करते तुझ्यावर..... तुला कसं समजावू माझं प्रेम तुला मी मेल्यावरही कळणारं नाही.....”

भरपाऊसात मरणाच तिच्या तोंडून नाव ऐकून आशुतोष तिला एक थापड मारतो...

“तू वेडी आहेस का आराध्या.......”

त्याला कवटाळत.... “हो हो हो.... आशु मी तुझ्यासाठी वेडी आहे अरे!”

तिला दुर सारत आशुतोष म्हणाला,”प्रेमाच हे वेड सोडून दे मी इथे शिक्षणघेण्यासाठी आलोय. तुझ्यासोबत अय्याशी करण्यासाठी नाही.”

आशुतोषचा स्वभावच असा होता आधी तर त्याने आराध्याला काही कालावधी मागितला होता... नंतर तिला सांगितलं फक्त मित्र म्हणून रहा... त्याला आराध्याचं प्रेमच स्विकारायचं नव्हतं तर त्याने श्री आणि इतर त्याचे रूममेटस ह्याच्या सोबत काही न बोलता समजून न घेता बाहेर पडायला नको होते....

आशुतोष नंतर कॉलेज संपूर्ण झाल्यावरही कधीच आराध्या सोबत बोलला नाही ती मात्र त्याचा सोबत बोलण्याचा प्रयत्न करत होती आणि हा सततचा तिला टाळतच राहिला... त्यादिवशी कॉलेजची चार वर्ष संपून फेरवेल पार्टी आयोजित केली होती.....

पार्टीत आराध्या लाल कलरचा गाऊन घालून आलेली होती त्यावर वाईट डायमन्ड इअररिंग तिने लावलेले होते... तिचा गौरवर्ण चेहऱ्यावर तो पेहराव शोभून दिसत होता... पार्टीत सर्व मुलांची नजर तिच्यावर रोखून धरत होती...

आशुतोषचा मनात येऊन गेलं शेवटचं वर्ष संपलं. कॉलेजही. पण इथून काहीच सोबत येणार नाही आपल्या. शिवाय इथे घालवलेल्या आठवणी!

आज ह्या पार्टीतच मी आराध्याला प्रपोज केलं तर! माझ्याकडून किती जिवापाड प्रेम करते ना. ती आपल्यावर आता ही करतच असेल....

म्हणून तो ती उभी असते हातात ज्युसचा ग्लास धरून तिथे तिच्या जवळ जाऊन आपल्या गुढघ्यावर वर बसत तिचा उजवा हात हातात घेत सर्वाचा समोर म्हणतो,

“आय रियली ल्व यू सो मच आराध्या......”

आराध्याला आकाश ठेगणं वाटायला लागते सारं जग तिच्या सोबत असल्याचे भास आभास रंगून जातात ती ह्याचं क्षणाची वाट बघत बसलेली असते....

🌷🌷🌷

पण,

नियतिला त्याचं उमलेलं प्रेमपुष्प बहरू द्यायचं नसते.....

प्रेमात बहरणं म्हणजे जग प्रेममय होणं. त्या प्रेमात सुखदुख: आप्तस्वकीय सर्वांचा वाटा. त्या प्रेमाला कुणाची नजर लागावी आणि अजणं फासत पापण्यांच्या कडेला गतकाळची उघड्या डोळ्याने पाहिलेली स्वप्ने अश्रूधारे सोबत वहात जावी....

असंच काही झालं आशुतोष आणि आराध्याच्या सोबत! !

आराध्याला गर्भाशयाचा कँसर झाला.... हे खुप उशिरा कळलं आणि जेव्हा कळलं तेव्हा खुप उशीर झाला होता....

आराध्या जग सोडून निघून गेली आशुतोष आजही तिच्याच आठवणीत जगतो तिच्याच प्रेमसागरात स्वतः ला झोकून घेतं ती इथेच कुठेतरी आपल्या सोबत आहे म्हणून तो एकांतात तिच्या फोटोसोबत गप्पा मारत बसलेला असतो.... प्रेम हे

असतंच असं! रडवणारं हसवणारं कधी कधी सोडून गेल्यावर विरह यातनेत दुखाचे हेलकावे देणारं......

आशुतोषला वाटलं आपण आधी जे तिला बोललो त्यावर ठाम असतो तर आज एवढा स्वतःला त्रास नसता झाला... पण, माझ्या होकाराने तिचा जीव सुखावला. तिची इच्छा अधूरी नाही राहिली. तिने केलेलं प्रेम पुर्ण झालं....

आता ती निघून गेली ह्या प्रेम वाटेवर आशुतोषला एकट्याला सोडून. पण तो एकटा नव्हताच मुळी

दोघातला एक निघून गेल्यावर प्रेम संपतं असं कुठे बधिस्त आहे... ते चिरकाल त्याच्या सोबत जगतच असतं...

भाग - ५

श्री........ त्या विचारकक्षेतून जागा झाला. आशुतोष भेटलाच कधी तर सांगू त्याला समजवून म्हणतं... पण, आराध्या जग सोडून गेली हे त्याला ही माहिती नव्हतं.

सुर्य उजाळला पहाटेचे पाच वाजताच आज ऋतुजाचा फोन वाजू लागला...

ट्रिंग ट्रिंगगगगगगग ट्रिंरीरीगगगगगSssssssss एवढ्या सकाळी आलाराम वाजायला लागला म्हणून ऋतुजाने फोन हातात घेतला तर तिच्या बॉसचा कॉल येतच होता......

ओहहहहहहहह नो “मिस्टर गोजावळे”

डोळे चोळतच तिने कॉल रिसव्ह केला....

“हॅंलो सर, हं बोला ना! काही काम होतं का?”

“ऋतुजा मॅंडम, मी फॉरेन टुरवर काही दिवसासाठी जातं आहो आज आपले ३ client घेऊन तुम्ही W4 ऑफीसला जा त्याच्या सोबत नवीन प्रोजेक्ट कालच मी साईन केला आहे. त्यांची सर्व जबाबदारी मी स्वतः सांभाळली असती, मला हे महत्त्वाचं काम नसतं तर, ते काम आता मी तुम्हाला सोपवलेलं आहे.... तिथे मदतिला तुम्हाला वरिष्ट मिळतीलच. काम योग्य रित्या समजून जाणीव पुर्वक करा काही अडचण भासल्यास मला कॉल करा... ठेवतो मी.....”

"सर सर पण......" ऋतुजाचं बोलणं ऐकून न घेता बॉसने फोन कट केला.

नवीन प्रोजेक्ट W4 ऑफीस तर खुप मोठं आहे. तिथले वरिष्ठ आपल्या सोबत कसे Behavior करतील ह्याच काळजीत ऋतुजा पडली.. तिने पुन्हा झोपण्याचा प्रयत्न केला पण तिला झोप काही येईना... तिने घडीकडे बघितलं तर साडेपाच वाजले होते. कोणी तिच्यासोबत बोलायलापण जागं नव्हतं....

ती तडख उठली आणि आशुतोषचा रूम मध्ये गेली.. रूम मध्ये किर्र्र्र्र अंधार पसरलेला होता झिरो लाईटचा उजेडही नव्हता. रूम मध्ये प्रवेश करताच तिने लाईट ऑन केले....

"दादा दादा उठना..... उठ लवकर."

आशुतोष चिडतच तिला म्हणाला,"ये बावळट ऋते झोपू दे ना मला. काय दादा दादा लावलं.... "

अस्वस्थ होतं ऋतुजा म्हणाली, "ओके जाऊदे.... सॉरी झोप तू."

ऋतुजा अस्वस्थ झाली आहे हे तिच्या आवाजावरून कळताच कशाचाही विलंब न करता झोपेत खोंळबा करतं आशुतोष उठला आणि तिला म्हणाला,"अगं माझी माय काय झालं तुला एवढं नाराज व्हायला..... हं सांग बघू आधी मला!"

जरा लटक्या स्वरातच ऋतुजा त्याला सांगायला लागते.....

,”अरे दादा बॉसचा कॉल आला होता नवीन प्रोजेक्ट मध्ये काम करायचं आहे म्हणाले. ऑफीस माहिती आहे कुठलं ते W4...”

तिला समजवतच आशुतोष म्हणाला,”अरे यार तू पण ना गं उगाच टेन्शन घेते. अजून तिथे जायचीच आहे.... तुला तर खुश व्हायला पाहिजे त्या ऑफीस मध्ये तुला तिथल्या लोकांसोबत काम करण्याची संधी मिळते आहे...”

आता कुठे आशुतोषने तिच्या चेहऱ्यावरील काळजीच सावट दुर केलं... ऋतुजाचा चेहऱ्यावर हास्य फुललं....

🙂🙂🙂

भाग - ६

ब्लँक फोरमल त्यावर ब्लू कलरचा छान टॉप तिने घातला...

3 client ला घेऊन ती निघाली तिथे जाताच.... ती समोरच बेंचवर बसलेली होती तर श्री येताना दिसला....

काय दिसत होता ना तो! हॅन्डसम.... त्याच्या गव्हाळ चेहऱ्यावर काचेची चौकस फ्रेम असलेला तो गॉगल उठून दिसत होता. फिकट गुलाबी रंगाचं शर्ट त्यावर ब्राऊन रेगाठी टाय लावलेला श्री त्याला येतांना बघून सर्व ऑफीस मधले प्यून कर्मचारी उभे राहिले... काहीही झालं तरी श्री त्याचा बाबांचा बिझनेस आता एकटा सांभाळत होता... ऋतुजाला ऐव्हाना कळून चुकलं की श्री ह्या ऑफीसचा मालक आहे...

ऋतुजाकडे त्याच लक्षच नव्हतं. तो सरळ आपल्या केबिन मध्ये गेला..

हा तोच श्री आहे ना ज्याने आपल्याला त्या रात्री पाऊसात घरी सोडून दिलं... खरचं हा श्री एवढा संस्कारी कसा असु शकतो, हा श्री ऑलराऊन्डर तर नाही आहे ना! असणारचं वाटतं... माझ्या वाटण्या न वाटण्याने काय होतं मी तर कल्पना नव्हती केली की हे ऑफीस त्याचं राहू शकतं...

त्या रात्री श्री ने तिला घरी सोडून दिल्यानंतर झोप ही आली नाही तिला सारखा एकच प्रश्न मनाला छळत होता. मी माझं नाव सांगताच श्री ने गाडीला ब्रेक का मारला?

तो माझं नाव ऐकता घामाघुम का होऊन गेला? तो दहावी पर्यंत माझ्यावर्गात शिकला म्हणे. म्हणून ऋतुजाने दहावीचा सेन्डफचा फोटो बघितला त्यात तिला श्री सारखा चेहरा असलेला सेम मुलगा दिसला... हा फोटो तिला आता त्या क्षणाला श्री ला दाखवाचा होता... पण मनात इच्छा असूनही ती दाखवू शकत नव्हती तिला वाटला हा आपल्याला चक्क वेड्यात काढणारं.

तिला खात्री झाली होती श्री फलर्टींग नव्हाताच करत. खरं बोलत होता तो!

भाग - ७

श्री मिंटीग हॉलमध्ये पोहचताच त्याला समोर चेअरवर ऋतुजा बसलेली दिसली.. तिला बघून त्याच्या चेहऱ्यावर जो आनंद ओसरून वहात होता तो बघण्यासारखाच होता.

त्याच्या चेहऱ्यावरचे भाव ऋतुजा पासून लपले नाही...

तो येताना बघून सर्व उभे झाले फॉर्मेलीटी म्हणून ऋतुजालाही उभं व्हावचं लागलं त्याच्या समोर

"हँलो सर, माय सेल्फ ऋतुजा ईनामदार.... हे आमच्या ऑफीसचे तीन मेंबर आहेत."

ती समोर काही बोलेल तोच तिला थांबवत श्री म्हणाला,"आय नो... मिस् ऋतुजा प्लिज टेक अ सिट.."

श्रीने प्रोजेक्ट बद्दल सविस्तर माहिती दिली...

अर्धा तास मिंटिग चालली. आता हा प्रोजेक्ट पुर्ण होईपर्यंत श्री आणि ऋतुजाची भेट रोजचीच ठरली होती आठवड्याचा रविवार वगळला तर....

श्री जेव्हा PPT वरून प्रोजेक्ट एक्सप्लेन करून सांगत होता तेव्हा ऋतुजाच त्याच्या हावभावांकडे हातवाऱ्यांकडे एकूणच काय तर ती श्रीच्या प्रत्येक

हालचालीकडे निरखून बघणं. श्री सुद्धा तिच्याकडे चोरून लपून बघतचं होता.... प्रेजेन्टेश्न संपल सर्व हॉलचा बाहेर पडले.

सर्व चाय कॉफी घेण्यात व्यस्त होते पण ऋतुजाचं कुठेच मन लागत नव्हतं ती एंकातात बसली होते. कोण जाणे तिच्या मनात काय चालू होतं. तिला घुसमट होत होती. घाबरल्या सारखं वाटतं होतं तिच्या मनाला वाटलं आपल्याला ह्या ऑफीसमधला कर्मचारी फॉलो करतो आहे. ती त्या सर्वापासून लांब रहात होती तो तिच्याजवळ येण्याचा अधिक प्रयत्न करतं होता. त्याचं नावही ऋतुजाला माहिती नव्हतं.

श्री च्या ऑफीस मध्ये पहिल्यादा प्रोजेक्ट तिच्या बॉसने डिल केलं होतं आणि ही त्याच्यासाठी सुवर्ण संधी होती, पण ऋतुजाला तिथे मात्र uncomfortable फिल होत होतं....

तो कर्मचारी ही त्याच्याच टिम मधला होता ज्याला श्रीनेच त्याच्या टिम मध्ये पार्टिसिपेट करून घेतलं होतं... त्याची येता जाता सारखी नजर आता ऋतुजावर होती. ऋतुजाला भिती वाटायला लागली होती.

तिला वाटतं होतं की आपण जाऊन श्री सरांना सांगाव तो मला फॉलो करतो आहे म्हणून...

पण सांगणार कसं त्याचं तर नावही तिला माहिती नव्हतं... शिवाय कोण विश्वास करेल माझ्यावर?

ह्याच भितीत तिचा अख्खा दिवस गेला. सहा वाजले तिला घरी निघायचं होतं. पार्किंग मध्ये गाडी ठेवलेली होती ऑफीसच्या मागे. शिवानीला अँटोने जायचं होतं म्हणून ती निघून गेली. ऋतुजा पायऱ्यावरून चालतं असताना आपल्या मागून तिला कोणी येत असल्याचा भास होत होता. समोर त्या व्यक्तीची सावली तिला पछाडत होती. ऋतुजा जशी पायरी उतरून खाली पाऊल ठेवतच तिचा पाय घसरला तर मागून कोणी तरी येत तिला पडताना हात धरून सावरलं. ऋतुजा चक्क घाबरलीच. परत मागे जिन्याच्या दिशेने बघू लागली. आपल्या समोर श्री ला बघून तिने त्याचा जवळ जातच..... "सर कोणीतरी मला फॉलो करतं आहे."

म्हणून रडू लागली.... "अरे हे बघा असं रडू नका प्लिज कोणी नाही आहे तुम्हाला भास होतो आहे."

श्री तिला समजवतच म्हणाला....

"नाही सर, कोणीतरी आहे तो... तो मिंटीग संपून बाहेर आली तेव्हापासून माझ्याकडे बघत आहे वाईट नजरेने." आधी श्रीला तर काही समजलच नाही ही कोणाला म्हणते आहे.

“ऋतुजा अगं तू हे काय बोलते आहे माझ्या ऑफीस मधलं कोणी आहे का? तू सांग मला फक्त कोण आहे तो?”

“सर तो तुमच्याटिम मधला मेंबर आहे उंचसा थोडा दिसायला सावळा...”

“कोण.... शरद बद्दल बोलतं आहे का तू? आठ दिवस झाले तो कामाला लागून. त्याचं प्रोफेशन बघून मी ठेऊन घेतलं काल. मला मालतीकडूनही त्याच्याबद्दल कम्पलेन्ट आली... त्याचं काही तरी करावंच लागेल....”

ऋतुजाला धक्काच बसला.... “मालती कोण? आणि तिला पण तो फॉलो करत असून तुम्ही त्याला अजून पर्यत काढून नाही टाकलं काही वाईट होण्याची वाट बघत आहात का तुम्ही?”

रागाच्या भरात ऋतुजा बोलून गेली...

“नाही ऋतुजा.... मालती आपल्या ऑफीस मधल्या client आहेत. त्या म्हणे मला त्या शरदच reputation काही योग्य वाटतं नाही. सारखा ऑफीस मधल्या तरूणीकडे येता जाता बघत असतो तो.”

ऋतुजा म्हणाली,”सर प्लिज त्याला उद्या काढून टाका तुम्ही तो उद्या मला इथे दिसला तर हा जॉब मी रिजाइन करेल..”

शरद तिला समजावतच म्हणाला,

“हो relax..... प्लिज! माझा नंबर नोट करून घ्या काही अडचण आली तर कॉल करा मला ओके, ड्रॉप करून देऊ तुम्हाला घरपर्यंत??”

आपल्या स्कुटीकडे बघतच ऋतुजा म्हणाली,”नाही स्कुटी आहे निघते मी...”

ह्या एक महिन्यात ऋतुजा हळूहळू श्रीचा प्रेमात पडत होती.... आता दोघात छान मैत्री झाली होती. दोघंही तासनतास फोनवर गप्पा करतं रहायचं रात्र रात्र फोनवर चाटिंग चालायची. झोप कशी लागायची दोघानाही कळायचं नाही.

🙂🙂🙂

भाग - ८

ऋतुजाचं प्रोजेक्ट वर्क पुर्ण संपल... आता श्री चा ऑफीस मध्ये जाणं ही बंद झालं! पण, श्री सोबत बोलणं चालूच होतं एक महिण्यात प्रोजेक्ट प्रेजेन्टेश्न मिंटिग ह्या सर्व धावपळीत श्रीने ही ऋतुजाला बाहेर कुठे चलायला invite नाही केलं... आज श्री चा मुड झाला होता. खुप दिवस झाले समुद्राच्या लाटांना डोळयात साठवलं नाही. तो मंद पाण्याचा शिंडकाव, अंगाला भेदणारी हवा.... त्याचा स्पर्श झालाच नाही!

ह्या धकाधकीच्या जीवनात माणुस निसर्गसृष्टि पासून किती ऐकलकोंडा होतो ना! श्रीच्या मनाला न राहून हे प्रश्न छळत होते.... त्याने लगेच खिशातून फोन काढला.  आणि ऋतुजाचा नंबर डायल केला...

“हँलो, ऋतूजा......”

तिने फोन उचलताच श्रीला खुप आनंद झाला.

जेव्हा कोणी आपलं बोलतं.... नाही म्हणजे आपण ज्यांचा प्रेमात असतो! त्याचा आवाजही कानाला स्पर्शून गेला तर किती बरं वाटतं ना....

“हँलो... बोला ना साहेब काय म्हणता?” लडीवाळपणे मस्करी करतं ऋतुजा म्हणाली....

“ये ऋतू तुला मी कितीदा सांगायचं गं मला साहेब सर नको ना म्हणतं जाऊ....” तिला जरा दटावतंच श्री म्हणाला.....

“हं नाही म्हणार श्री....”

“हं गुड....”

“अजून काही.....”

श्रीच्या मनात प्रश्न पिंगा घालतं होते कसं म्हणू हिला की बाहेर चलते का समुद्राकडे फिरायला. हीला वाटेल हा मला प्रपोज करायला डेट करतो की काय?? प्रेम करतो हे ही सांगावंच लागेल ना कधी नाही कधी. नाहीतर माझं प्रेम मरेपर्यतं मी एकतर्फी समजतच कोसत राहिल.... तिला वाईट वाटलं तर?? शट्ट् चांगली मैत्रीण पण गमावून बसेल मी...

“अरे श्री कसला ऐवढा विचार करतो बोलायला?”

ती आहे फोनवर ह्या तंद्रीत तो विचारातून जागा तर झाला पण तिला येते का फिरायला कसा म्हणू? मोठ्या हिंमतीने श्री बोलता झाला....

“काही नाही गं ऋतु खुप उदास वाटतयं घरी असं वाटतं कुठेतरी जावं फिरायला...”

ऋतुजाला त्याच्या भावना समजत होत्या पण ती थट्टा करतं त्याला म्हणाली,

“जा ना मग फिरून ये....” असं म्हणतचं ती गालातल्या गालात हसतं होती.

"अगं सोबत नाही गं कोणी माझ्या म्हणून तर एकटा पडलोय मी....."

"एकटा..... श्री तू एकटा..." म्हणतच ती हसायला लागली. 🙂🙂🙂🙂🙂

तिचं हसणं आता श्री ला ऐकायला येतच होतं.....

"ये बावळट ऋते काय झालं हसायला एवढं तुला??"

परत हसतच ऋतुजा त्याला म्हणाली, "मी येऊ का तुला तिकडे company द्यायला....."

श्रीला वाटलं खरचं येते की काय ही म्हणून तो म्हणाला.... "अगं खरचं ये ना! प्लिज...."

त्याची परत मज्जाक उडवतं ऋतुजा म्हणाली, "आली..... असती रे पण घरी कोणी नाहीये ना!"

आता श्री जरा नाराज होतच तिला म्हणाला,

"जा नको येऊ. बस्स घरीच. तुला चल पण म्हणणार नाही मी कधीच....."

त्याचा आवाजा वरून ऋतुजाला कळलच हा नाराज झालाय आता. म्हणून तिच म्हणाली, "अरे मी तर तुझी मस्करी करतं होते बरं सांग कुठे भेटायचं??"

ती खरंच आपल्या सोबत भेटायला येते आहे म्हणून श्री तर नाचायलाच लागला.... “आपण समुद्र चौपाटीवर जाऊ खुप दिवस झाले तिकडे न जाऊन....”

“Done! मी आलेच तयारी करून.....”

“मी वेट करतो तिकडे तुझी.....”

असं म्हणतंच श्री ने फोन कट केला....

श्री तिकडे जाऊन तिची एकटा वाट बघत रस्त्याने भिरभिर नजरेने तिचा शोध घेत होता.

ऋतुजा त्याच्या मागून येत श्री चा खांद्यावर हात ठेवत म्हणाली,

“श्री......”

तिच्या हाताचा स्पर्श होताच मागे वळत श्री म्हणाला, “अगं तू मागून आली मी तुला समोर शोधतं होतो.....”

हसतच, “म्हणूनच मी तुझ्या मागून आली....”

“किती खोडकर आहे गं तू..... अजूनही बालीशपणा नाही गेला तुझ्यातला किती मस्करी घेशील अजून माझी??”

त्याचा प्रश्नाच उत्तर न देता ऋतुजाने त्याला डायरेक्ट प्रश्न केला.

“श्री मला सांग आपण फक्त बेस्ट फ्रेन्डच आहोत का रे?”

श्री चा चेहऱ्यावरीही तिचा हा प्रश्न ऐकून बारा वाजले तरी स्वतःला सावरत तो म्हणाला, “हो अगं..... आपण फक्त बेस्ट फ्रेन्ड आहोत.”

तिच्यापासून नजर लपवत श्री म्हणाला......

“माझ्या डोळयात बघून सांग ना श्री आपण फक्त आणि फक्त मित्र आहोत म्हणून.....”

दोघेंही किनारपट्टीवर पोहचले होते. समुद्राच्या उसळत्या लाटा कानाला स्पर्शून जाणारा थंड वारा.... किती रहस्यमय ओढ्यात टाकणारं दृश्य sunset च्या त्या सौदर्यं सृष्टित दोघंही निवांत सागरी किणाऱ्यावर पहुडले होते...

श्री ला सुचत नव्हतं हिला काय सांगावं?

आपण तर गेली कितेक वर्ष झाली वर्ग पाचवी सहावी पासून ऋतुजाचा चेहरा ह्रदयात जपून ठेवलाय अगदी आजही तो तसाच.... वेड्यात काढेल कोणी ह्या आशिकाला हिर राजा, नैना मजनू ह्यांनी काय ऐवढ प्रेम केलं असेल पण त्याचा रांगेत आपण कुठेच कसं बसतं नाही...

प्रेम करतो हे तिला सांगणं खरचं गरजेचं आहे का? की न सांगता प्रेम करतं रहाणं योग्य आहे..... ती तर आता कुठे माझ्या प्रेमात पडली. म्हणून,

“ऋतुजा, तुला प्रेम ही संकल्पना कशी वाटते?”

“अरे, श्री प्रेम ही संकल्पना म्हणतोय तू? प्रेम म्हणजे प्रेम असतं अरे बाकी मला कोणती संकल्पना मला नाही माहिती......”

श्री खवळणाऱ्या लाटाकडे बघत बोलू लागला,

“आपण तिच्यावर पंधरा सोळा वर्षांआधीपासून प्रेम करावं वर्गात नकळत तिला चोरून बघावं. तिला आपण प्रेम करतो ह्याची साधी भनक ही न लागू देता.... तुला काय वाटतं ऋतुजा हे प्रेम तो मरेपर्यत त्याच्या सोबत एकतर्फी प्रेम म्हणून संपून जावं??”

ऋतुजाच्या हार्टबीट वाढल्या ती समजली श्री कुणाच्या तरी एकतर्फी प्रेमात आहे..... “श्री अरेरे कोणाबद्दल बोलतोय तू हे? प्रेम आपण ज्यावर करतो त्या व्यक्तिला आपल्या निस्वार्थ प्रेमाची जाणीव करून देणं खरचं गरजेचं आहे अरे......”

ऋतुजा आपल्या मनातल्या भावना व्यक्त करतं म्हणाली....

“अं$$$$ जाऊदे चल तू काही खाणार?... आपण निघूयात आता??”

श्री ला थांबवतच ऋतूजा म्हणाली, “श्री मला तुला काही द्यायचं होतं......”

श्री ला ओळखण कठीण होतं काय द्यायचं असेल ऋतुजाला आता....

तिने आपल्या बॅंग मध्ये हात टाकला आणि एक चिठ्ठी काढली..... ती श्री च्या हातात ठेवतच म्हणाली,“श्री हे घे..... घरी जाऊन वाचून नंतर मला सांग आणि प्लिज राग येईल तुला माझा तर बोलणं नको टाळशील आधी आपण बेस्ट फ्रेन्ड आहोत......”

श्री तिच्या चेहऱ्यावरचे भाव न्याहाळत उभा होता ती चिठ्ठी घेऊन त्याने खिशात टाकली.... “श्री अरे असा काय बघतो मला कधी न बघितल्या सारखं.....”

तिच्या चेहऱ्यावरून नजर हटवत तो ऋतुजाला विचारता झाला, “ऋतुजा, तो एकतर्फी प्रेमी तुझ्यावर प्रेम करत असता हे तुला माहिती झालं असतं तर तू काय केलं असतं त्याच्या प्रेयसीच्या जागी तू स्वतः असती तर....”

ऋतूजाला श्री खुप पेचात बोलतं होता तिला त्याचं बोलणं समजतं होत़ तरी ती जाणून म्हणाली, “श्री ते तू मला कशाला विचारतो अरे, चल........”

श्रीने त्या दिवशी ऋतुजाला घरपर्यंत सोडून दिलं तिला खुप बरं वाटलं श्री आपली किती काळजी घेतो....

आता ती श्री च्या होकाराच्या प्रतिक्षेत होती.....

भाग - ९

पराग श्री च्या संपर्कात होताच. पराग आज आयआयटी मध्ये प्राध्यापक म्हणून रूजू होता. काही ऑफीसच्या कामासाठी त्याला दिल्लीला जाण्याचा योग आला. आजही तो आराध्याचा शोधात होता तिला सॉरी म्हण्यासाठी... त्याचा एकट्याचा चुकीमुळे दोन मित्र दुरावले होते... त्या मित्रांना त्याला एकत्र हसताना एका पलेटेमध्ये खाताना बघायचं होतं सर्व राग रूसवे विसरून...

आणि हे सत्य आशुतोष पर्यत आराध्याच पोहचवू शकणारं होती.. पराग दिल्लीत येऊन पाच दिवस झाले तो एका फायस्टार हॉटेल मध्ये थांबलेला होता... त्या रात्री त्याला तिथे सेम आराध्या सारखी मुलगी दृष्टीस पडली... तो आपल्या मेंबर्सला समोर पाठवून त्या खुर्चीकडे वळला ती मुलगी आपल्या मैत्रीणींसोबत तिथे डिनरला आली होती.

दिसायला आराध्या सारखीच; सेम डोळे, तिचेच उंची वर्ण सारखाच.... आता तर त्याला खात्री झाली ही आराध्याच आहे... पाच सहा वर्षा पुर्वीची आराध्या जशी होती सेम तशीच होती ती..

विलंब न करता पराग तिच्या टेबल जवळ गेला... तिच्या जवळ जातच तो म्हणाला,

“हँलो आराध्या, ओळखल मला?”

ती उभी होतच म्हणाली,“कोण आराध्या?”

“अरे तू आराध्या आहे ना! विसरलीस का? बरं आशुतोषला नसेल विसरली. हे बघं तुमचं काय चालयं मला काही करायचं नाही पण माझं ऐकून घे ती चिठ्ठी मी तुला लिहीली होती श्री ने नाही. घाईत मी खाली माझं नावं लिहायचं राहून गेलो....”

परागला थांबवतच ती म्हणाली,

“हँलो मिस्टर, मी कोणी आराध्या नाही जेजे हॉस्पिटल मध्ये मी एक सर्जन आहे.... डॉ. आशना.... समजलं! निघा आता.....”

परागने त्या हॉस्पिटलचं नाव नोट केलं तिच्याकडे बघतच तो तिथून आपल्या रूम मध्ये गेला..

**********

श्री नुकताच ऋतुजा सोडून घरी आला आणि आपल्या बेडवर जाऊन खिशातली चिठ्ठी हातात घेऊन खोलतच तर त्याचा फोन वाजला ऐवढ्यात.....

ओहहहह नो हटट् आता कुणाचा कॉल असावा. त्याने फोनकडे बघताच परागच नाव स्क्रिन वर...

“हं बोल पराग....”

“अरे श्री आज मला आराध्या दिसली होती....” तो खरं तेच सांगत होता पण श्रीचा त्यावर विश्वास बसेना.

“अरे वा आशुतोष सोबत होती का मग ती.... बोलला का तू तिच्या सोबत.”

पराग त्याला सांगू लागला,

“ती बोलली की मी आराध्या नाही डॉ. आशना आहे.....”

श्री पण बुचकळ्यातच पडला आता...

“आशना नामकरण केलं की काय तिने... आणि तुझा चष्म्याचा नंबर तपास एकदा..”

“अरे श्री मी खरं सांगतोय ती आराध्याच होती. तिने तिचा हॉस्पिटलच नाव पण सांगितलं तू ये यार इकडे ताबडतोब....”

“जस्ट चील डाउन यार! आशुतोष सोबत संपर्क करण्याचा प्रयत्न करतो मी... प्लिज वेट माय कॉल....”

श्री ने ऋतुजाची चिठ्ठी आपल्या पाकेट मध्ये ठेवली आणि ऋतुजाला कॉल केला... ऋतुजा त्याच्या होकाराच्या प्रतिक्षेत बसलेली होती... त्याचा कॉल येताच तिच्या चेहऱ्यावर हास्य फुलले तिला वाटलं श्री ने आपला स्विकार केला.... पण, फोन उचलताच श्री चा घाईचा सुर ऐकून तिला काही कळू नाही लागलं...

“ऋतुजा अगं मला लवकर आशुतोषचा नंबर दे!”

ऋतुजा वाटलं श्री माझ्या लेटर बद्दल दादाला सांगण्यासाठी त्याचा नंबर मागतो आहे. "श्री अरे मला घरच्याना आताच नाही सांगायचं आहे आपल्या बद्दल....”

श्री ने त्याच्या पाकिटाकडे बघितलं ते लेटर अजून त्याने वाचलेल नव्हतं. तिचा बोलण्यावरून त्याला लेटर मध्ये काय लिहील़ असावं हे समजलचं...

“अगं ऋतुजा मी आपल्या बद्दल नाही बोलत आहे तुझ्या भावासोबत मला महत्त्वाचं काम आहे... तुला सर्व नंतर सांगतो मी समजावून प्लिज दे यार नंबर वेळ कमी आहे माझ्याकडे.... "

ऋतुजाने कॉनट्याक्ट लिस्ट मधून नंबर काढला,

“हं लिहं.....”

“ओके ऋतुजा नंतर बोलतो मी तुला... बाय tc!”

असं म्हणतं श्री ने फोन ठेवला....

बाहेर पाऊस रसरसून बरसू लागला ढगात गडगडाट सुरू झाला विजा कडाडत होत्या...

श्री ने आशुतोषचा नंबर डायल केला.....

भाग - १०

श्री च्या मनात अनेक प्रश्न. बाहेर सोसाट्याचं चक्री वादळ इथे श्री च्या मनात प्रश्नाचे चक्रव्यूह.....

“हॅंलो..... कोण?”

आशुतोषला नवीन नंबर दिसला... तसं श्रीने ही जाणून त्याच्या नविन नंबर वरूनच कॉल केला होता.

“आशु प्लीज यार मला तुझ्या सोबत खुप महत्त्वाचं बोलायचं आहे.... फोन कट नको करू माझं ऐकून घे!”

आशुतोषला श्रीचा आवाज ओळखीचा वाटला.... बोलावंसं त्याला वाटतं तर नव्हतं. तरी तो ऐकून घ्यायला सहा वर्षा नंतर आज तयार झाला होता...

“हं बोल....”

श्री ला वाटतं होतं इथून पुढे बोलताना ह्याचे शब्द आपल्याला विकत घ्यावं लागतील.

“ओळखलं ना मला?” श्री ने आशुतोषला प्रश्न केला.....

“हो, तुला कोण विसरेल.....”

आशुतोषच्या बोलण्यातून श्री ला त्याच्यावर असलेला आशुतोषचा राग जाणवत होताच...

"आशु अरे त्या दिवशी तुला जी चिठ्ठी आराध्याने दाखवली ती मी नव्हती लिहीली तिला ती तर यार परागने लिहीली होती तिला... हव तर तू आराध्याला विचारून घे पराग पण तुला भेटण्याचा प्रयत्न करतो आहे... त्या दिवशी तू माझ्यावर दोषारोप करत काहीच ऐकून न घेता निघून गेला..."

आशुतोषला आता खरं कळलं होत पण काय बोलावं सुचत नव्हतं त्या दोन वर्षात श्री त्याचा बेस्ट फ्रेन्ड झाला होता आणि त्याची ताटातुट ही तशीच झाली....

"श्री, अरे ती चिठ्ठी तू नेऊन दिली होती ना आराध्याला म्हणून तिने तुझं नाव सांगितलं आणि खाली नावं नव्हतचं कुणाचं.... आणि श्री आराध्या नाही आहे...."

आशुतोषच बोलणं जरा श्रीला बुचकाड्यात पाडत होतं...

"आराध्या नाही आहे म्हणजे आशु??"

श्री चा कातर स्वर अंगावर थरकाप देत होता... त्याला आराध्याच्या मृत्यु बद्दलची कल्पना नव्हतीच..

"श्री अरे सहा वर्षा आधीच मी ज्या आराध्यावर प्रेम करायचो ती आराध्या......" आशुतोष बोलताना मधातच थांबला.... त्याचा डोळयातून घळघळा

अश्रू वहात होते.. आजपर्यंत तो स्वतः लाच सांगत आला आपली आराध्या हे जग सोडून गेली पण कोणत्याच जवळच्या

किंवा दुरच्या मित्राने त्याच्या दुखी रहाण्याचे कारण त्याला विचारले नाही. आणि आराध्या बद्दल तर आशुतोषच्या त्याचं रूममेटस ला माहिती होते... आज सहा वर्षानंतर आराध्याचं नावं त्याच्या ओठून एका मित्राजवळ निघत होतं.....

“आशुतोष अरे काय झालं??”

“श्री अरे आराध्याला गर्भाशयाचा कर्करोग झाला होता... आणि त्यातच तिचे निधन झाले!”

आता श्रीला काय चालयं कळू नाही लागले.....

आयुष्य म्हणजे बंद डायरी का?  वाचताच क्षणी एकएक रहस्याचा उलगडा होतं जावी अशी...

“अरे आशु परागने काही वेळा पुर्वी आराध्याला स्वतः च्या डोळयाने पाहिले.... तो खोटा तर नाही ना बोलू शकतं....”

आता आशुतोष मात्र चिडलाच श्री वर...

“बे श्री किती मुर्ख आहेस तू त्याचावर विश्वास नको ठेऊ मी स्वतः माझ्या डोळयासमोर आराध्याला जळताना बघितलं.... '

श्रीचीही आता खूपच घालमेल झाली. तो आशुतोषला म्हणाला, “मी आज दीडच्या फलाईटने दिल्लीला निघतो तू येणार सोबत?? हा पराग किती खरं बोलतो आणि किती खोट ते तिथे गेल्यावरच माहिती होईल.... आणि सोबत तुझं माझ्यासोबत एवढे दिवस न बोलण्याचं प्रण... ती चिठ्ठी कोणाची होती ह्याचा उलगडाही होईल.... चलणार का?”

“नाही तू जा. माझी आराध्या नाही आहे.... त्या परागवर मी कसा विश्वास ठेऊ??”

“त्याच्यावर विश्वास नको ठेऊ. पण, तुला असं वाटतं का तू एवढे वर्ष झाली माझ्या सोबत बोलला नाही म्हणून आपली बॉडींग तुटली.... मी आजही तुला बेस्ट फ्रेन्डच समजतो. यार झाल्या काही चुका माझ्याही हातून पण तू ऐकायलाही तयार नव्हता आता माझ्यासाठी चल!”

आशुतोषने काहीच न बोलता फोन ठेवला......

श्रीने परत त्याला कॉल करण्याचा प्रयत्न नाही केला.... दीडच्या फलाईटने निघायचं होतं त्याने

परागला येतो म्हणून कॉल केला.... बँग पँक केली त्यानी.... बाहेर विजांनी ताडवं घातलं होतं

मुसळधार पाऊस तेवढ्या रात्री त्याने ड्रायवरला उठवून आणलं....

भाग - ११

श्री तेवढ्या मुसळधार पाऊसात निघाला कारमध्ये त्याने ऋतुजाने दिलेली चिठ्ठी काढली...

®®®

डियर श्री,

सर्वांत आधी सॉरी प्लिज.... तुझ्या समोर व्यक्त व्हायची भिती वाटली मला म्हणून असं अनामिकपणे पत्र लिहीली मी... तुला माझा राग आला तर सांगते मला माफ करशील ना!

अरे माहिती नाही मला... पण, तुला खरं सांगू मी प्रेमात पडली यार तुझ्या... सारखे तुझे विचार येत असतात मनात. उठता बसता खाता पिता झोपेतही तू आणि तूच.... असं वाटतं मी प्रेमात पडली तुझ्या I really love with you.... श्री!

आपण ज्या व्यक्तिवर खरं प्रेम करतो हे त्या व्यक्तिला सांगणं खुप गरजेचं असते. अरे नाहीतर वेळ निघून जाते त्या तुलनेत व्यक्तिही आपल्या पासून दुरावतात... तू नकार दिला तरी मी समजेल. मी प्रेमात माती खाल्ली म्हणून... पण प्रेम एकतर्फी ठेवणं ही खंत मनात बाळगून जगता नसतं आलं मला... तू माझ्या प्रेमाचा स्विकार करणार आहेस की नाही, हे मला ठाऊक नाही! तू होकारच द्यावा मला असं ही काही नाही.... प्रेमही आतंरीक ओढीने व्हायला पाहिजे आणि मला ते तुझ्यावर

झालं... तू प्रेम करतो माझ्यावर असं मला कधी जाणवू दिलं नाही... मला असं का वाटतं असावं की तू प्रेम करतो माझ्यावर कदाचित ह्या मुळे आपली मैत्री प्रेमाच्या अलीकडे आणि मैत्रीच्या पलीकडे आहे..... घुसमट होते मला नेमकं आपल्यात नातं तरी कोणतं आहे ह्याच विचाराने मैत्रीचं की प्रेमाचं??

तुलाच विचारावे वाटले प्रश्न माझ्या मनातले. छळतात हे प्रश्न मला खुप. तू प्लिज समजून घे. आणि प्रेम करते मी तुझ्यावर.... रागावू नको माझ्यावर समजून घेशील ना मला श्री??

तुझीच,

ऋतुजा 😘

श्री ला एवढा आनंद झाला त्याला क्षणभर वाटलं कार मधून उतरावं आणि पाऊसात नाचून

सरीना सांगावं... मिळालं माझं प्रेम मला!

आपण ज्याचा प्रेमात जगतो तो ही आपल्यावर प्रेम करतो हे कळल्यावर जो आनंद

ओसरून वाहू लागतो ती प्रेमाची फिंलिगच किती सुखद असते ना!

💕

भाग - १२

“सर ऐअरपोर्ट आ गया...”

ड्रायवरचा आवाज ऐकताच श्री भानावर आला चिठ्ठी त्याने खिशात ठेवली... कार मधून उतरून टिकीट काउन्टर जवळ येताच त्याला आशुतोषची पाठमोरी आकृती दिसली... तो त्याच्या दिशेने वळला. तो जवळ जाईल ऐवढ्यात आशुतोष मागे फिरला....

आज सहा वर्षानंतर श्री आशुतोष एकमेकांसमोर उभे होते.... काय बोलावं?? सुचत नव्हतं दोघांनाही समोरासमोर येताच दोघही न्याहाळत रहाले.. आशुतोष पुढे येतच त्याने श्री ला आलिंगनबद्ध केले.. श्री ही त्याच्या मिठीत विसावला.

“कसा आहेस मित्रा?”

आशुतोषने दुर होतच श्री ला प्रश्न केला....

“मी मज्जेत... तू कसा आहेस हल्ली जेवण करतो की नाही किती बारीक झाला यार आशा तू?”

काहीच न बोलता क्षणभर गप्प असलेला आशुतोष श्री ला म्हणाला,

“चल फ्लाईट निघून जाईल.... '

श्री ला समजायला उशीर नाही लागला आशुतोष टाळत होता काही गोष्टी, नाईलाजाने श्री ला निघावं लागलं त्याच्या सोबत....

फ्लाईट वेळात आली.... श्री आशुतोष जवळच बसले.... दोघात भयाण शांतता विस्तारलेली होती.

श्रीला वाटलं फोन काढून ऋतुजाला मॅसेज करून आय ल्व यू तरी म्हणावं आनंद तरी होईल तिला पण, जाऊदे असं मॅसेज वर बोलण्यापेक्षा कॉलवर सांगावं तिला नाहीतर भेटल्यावर भेट कधी होईल आता माहिती नव्हते.... आशुतोष श्री ला न्याहाळत होता. कसला विचार करत असावा हा??

म्हणून तो त्याला विचारता झाला,

“काय रे श्री ऐवढा कसला विचार करतोय?”

आशुतोषच्या त्या बोलण्याने श्री भानावर येत म्हणाला,

“हं काही नाही.... काही नाही रे आशु...!”

आशुतोषपासून पहिल्यादाचं श्री आपल्या मनातील भावना लपवून ठेवत होता त्याच्या मनात त्या क्षणाला विचार येऊन गेला... जर आशुतोषला ऋतुजा बद्दल आणि माझ्या प्रेमाबद्दल समजले तर आशु काय react करले?? विरोध तर नाही दर्शविणार ना!”

हा विचाराचा पसारा दुर सारत श्री आशुतोषला म्हणाला,

“आशुतोष तिथे गेल्यावर काय होईल यार कोण असेल ती मुलगी? तुझी आराध्या तर तू म्हणतो ह्या जगात नाही मग तिच्यासारखीच हुबेहुब दिसणारी ती डॉक्टर कोण असेल??”

भाग - १३

खरं तर कोड्यात फसल्यागत वाटतं होतं आशुतोषला ती सेम त्याच्या आराध्यासारखी दिसणारी कोण होती? हे आशुतोषलाही ठाऊक नव्हते त्याने तर तिला बघितलेही नव्हते...

आशुतोष आणि श्री दिल्लीत पोहचले.... तिथे पोहचताच ऐअरपोर्टवर पराग त्यांना कारने घ्यायला आला.... आशुतोष आणि पराग एकमेकांसोबत बोलण्यापासून अलिप्तच होते.

परागने आपली कार ती मुलगी ज्या हॉस्पिटल मध्ये डॉक्टर होती तिकडे वळवली.

“श्री आपण सर्वप्रथम त्या हॉस्पिटल मध्ये जाऊ, माझं बोलणं खोट नव्हतं प्रत्यक्षात बघितलं मी तिला माझ्या डोळ्याने.....” पराग बोलला....

खरं काय खोटं काय हे श्रीला माहिती नव्हतं. आराध्या हे जग सोडून गेली हे त्याला आशुतोष कडून रात्रीच माहिती झाले... आणि पराग सांगतो त्याला तो ज्या हॉटेल मध्ये मुक्कामाला होता तिथे त्याने डिनर हॉल मध्ये आराध्याला पाहिले....

किती गुंतागुतिचं....

“तिला बघितल्यावरच उलगडा होईल आता..” श्री बोलला.

तिने हॉल मध्ये परागला आपले नाव आणि हॉस्पिटलचा पत्ता सांगितला होता. त्याच पत्त्यावर पराग श्री आणि आशुतोषला त्या हॉस्पिटल मध्ये घेऊन गेला....

हॉस्पिटल समोर कार उभी केल्यावर वैतागून श्री परागला म्हणाला,

“पराग हे हॉस्पिटल समोर का गाडी स्टॉप केली...”

“ती ह्याच हॉस्पिटल मध्ये डॉक्टर आहे म्हणून.....” पराग कारचा दरवाजा उघडतच म्हणाला.

तिघेही त्या हॉस्पिटल मध्ये पोहचले.... परागने तिथल्या एका सिस्टरला डॉ. आशना बद्दल विचारले.

सिस्टरने त्यांना बसायला सांगितले...

“सॉरी सर, आशना मॅडम operation theatre मध्ये आहे. दहा मिनिटांनी बाहेर येतीलच तुम्ही इथे बसून वेट करू शकता...”

त्यांना बसायला सांगून सिस्टर निघून गेल्या... आशुतोष तर सारखा ती कधी येईल म्हणून चारही दिशा धुडाळून बघत होता... दहा मिनंटाचा अर्धा तास झाला.. सिस्टरने तिला बाहेर येताचं सांगितले तुम्हाला कोणीतरी भेटायला आले म्हणून तशीच ती वेटिंग रूमकडे गेली...

तिला येतांना बघून आशुतोष बघताच क्षणी भांबावून गेला. तडक तो आपल्या जागेवर उभा रहाला...

ती जवळ येईपर्यंत तो तिला बघतच राहिला.... पुतळ्या सारखा स्तब्ध आशुतोष हालचाल न करता तिला न्याहाळत उभा होता... तिचीही नजर आशुतोषच्या चेहऱ्यावरून हटत नव्हती....

श्री ला तर वाटलं ही आराध्याच असावी.... परागकडे बघत ती उद्गारली, “तुम्ही इथे का आले त्या दिवशीच मी सांगितलं ना तुम्हाला मी कोणी आराध्या नाही....”

आशुतोषला ही काय बोलावं तिच्याशी सुचत नव्हतं श्री मध्ये बोलत म्हणाला,

“आशुतोष सांग तुझी आराध्याही अशीच दिसायची ना! फोटो दाखव ह्यांना तुझ्या आराध्याचा...”

आशुतोष खिशातून फोटो काढत तिला देत म्हणाला,

“आराध्याही माझी अशीच दिसायची पण तिला मी माझ्या डोळयासमोर जळतांना बघितलं....”

फोटोकडे बघत ती म्हणाली,

“मी सुद्धा तुमच्या मित्राला हेच सांगण्याचा प्रयत्न केला मी कोणी आराध्या नाही डॉ. आशना आहे...”

डोळयातले अश्रू पुसत ती जायला निघाली....

भाग - १४

आशुतोषला तिला अचानक जातांना बघून ही काहीतरी आपल्या पासून लपवत आहे असं वाटलं.. फोटोकडे बघून तिच्या डोळयात अश्रु का आले असावे? ती तरी म्हणतं होती की ती कोण आराध्या तिला मी जाणत पण नाही मग असं अचानक निघून जाण्यामागे काय कारण असावं ती दारापर्यंत पोहचताच आशुतोषने आवाज दिला,

“डॉ. आशना.....”

श्री ह्यांच्या मधात काहीच बोलत नव्हता भिंतिला रेटून तो उभा होता... आवाज कानी पडताच आशना थबकली डोळयातले अश्रु लपवत ती रागातच म्हणाली,

“हे बघा मला काम आहेत निघायचं आहे....”

आशुतोष तिला म्हणाला, “आम्ही खरं काय हे जाणून घेण्यासाठी तेवढ्या दुरून आलो परागच्या सांगण्यावरून की आराध्या जिवंत आहे ती ह्या जगात नाही आहे हे ही खरं आहे पण, तुम्ही आमच्यापासून नक्कीच पळवाट काढत आहात....”

आशुतोषजवळ येऊन ती म्हणाली,

“खरं जाणून आता काय करणार तुम्ही??”

श्री ला वाटलं आता ह्या दोघात वाद होणार म्हणून तो मधेच म्हणाला,

“चल यार आशुतोष निघूयात ना आपण...” आशुतोष त्याचं बोलण टाळत तिला म्हणाला,

“डॉ. आशना मला खरं जाणून घ्यायचं आहे.....”

“चला तर मग बाहेर....” ती म्हणाली..

“बाहेर पण कुठे??”

“कॉफीशॉप मध्ये चला खरं जाणून घ्यायचं आहे ना तुम्हाला.....”

श्री पराग आणि आशुतोषही तयार झाले त्यांनी कार काढली एकाच कार मध्ये ते कॉफीशॉप वर निघाले... कार मध्ये श्री समोर बसलेला होता पराग सोबत आणि मागच्या शिटवर आशना आणि आशुतोष...

आशुतोषला तिच्या जवळ बसल्यावर फिल व्हायला लागलं की आपण आपल्या आराध्या जवळच बसलोय....”

श्री समोर बसलेला मागे बघत डॉ. आशनाला म्हणाला,

“आशनाजी आपने अभी तक शादी क्यूँ नहीं की वैसे आपकी उम्र क्या होंगी....”

आशना श्री ला म्हणाली, “नहीँ करनी थी मुझे शादी क्यूँ??”

आशुतोष हसतच म्हणाला, “क्यूँ बे श्री तुझे करनी है क्या इनसे शादी?”

“नहीं नहीं यार मेरी बनती नहीं किसी डॉक्टरसे. मैं तो बस ऐसे ही सवाल कर रहा था!”

कॉफीशॉप आले....

चौघही एकमेकांसमोर बसलेले होते कोणी कुणासोबत बोलत नव्हतं भयाण शांतता होती... एवढ्यात श्री म्हणाला,

“आपण एकमेकांचे तोंड निरखू निरखू बघायला आलोत का इथे कुछ तो बोलो यार गाईज.....”

“वेटर चार कप कॉफी लाना!” परागने कॉफी आर्डर केली....

आशना जरा ओशाळल्या स्वरातच म्हणाली,

“मी आराध्याची जुडवा बहिण आहे आशना.....”

श्री पराग आशु ऐकून आश्चर्यचकितच झाले.....

आशुतोष म्हणाला,

“काय मग ऐवढा वेळ ही गोष्ट आमच्यापासून का लपवून ठेवली.....”

आता एक एक गोष्टीचा उलगडा करतं ती सांगू लागली.....

“आमच्या घरासमोरच्या बिल्डिंग मध्ये तुम्ही मित्र रहायला आले... माझ्या रूमच्या समोरच तुमची रूम दिसायची तेव्हा मी एकदा आशुतोषला कॉलेज मध्ये जात असताना बघितले.... आणि त्या दिवसापासून आशुतोषला बघतच राहिली..... येताजातांना!”

आशुतोष मधातच थांबवत तिला म्हणाला,

“हे काय बोलत आहे.... मला का?”

ती त्याच्या पासून नजर लपवत म्हणाली,

“हो, तुम्हालाच....”

श्री म्हणाला तू आशुतोषला का बघायची त्या वर ती बोलली,

“मी आशुतोषच्या प्रेमात पडली होती....” असं म्हणतचं ती हसायला लागली.

हसता हसता तिच्या डोळयात पाणी आलं आणि ती समोर सांगू लागली,

“रात्रीच्या कोळोखात भर गच्च चांदण्यानी भरलेल्या आकाशाखाली आम्ही दोघी बहिणी विसावा घ्यायला म्हणून टेरीसवर बसलेलो होतो निवांत रात किड्याचा किर्र्रर्र् आवाज काय तो गोगाट घालत होता बाकी silent.... दी आणि मी

एमबीबीएस च्या एकाच वर्षाला होतो पण आमचं कॉलेज वेगळ होतं... होतो दोघीही एकाच वयाच्या! दोघीची आवडनिवडही एकच एवढच काय तर लहानपणी भांडणही व्हायची आमच्यात.... दि ने त्या रात्री मला कधी न विचारलेला प्रश्न विचारला....."

श्री म्हणाला,

"कोणता प्रश्न?"

"दी बोलली तुझा प्रेमावर विश्वास आहे? मी म्हटलं हो ती म्हणाली तुला कोणी आवडतो का? मी तिला म्हटलं हो दी.... त्यावर ती म्हणाली कोण? मी म्हटलं नंतर सांगते तुला पण कोणी आवडतो का दी तू कुणाच्या प्रेमात आहे का? तर दी ने समोरच्या बिंल्डींगकडे बोट खुणावत सांगितले.... मी म्हटलं दी कोण? ती म्हणाली आहे एक राजकुमार माझ्या स्वप्नातला माझ्याच क्लासमध्ये आहे तो उद्या दाखवते तुला..... माझ्या मनात भिती होती तो तोच तर नसेल ना! ज्याला मी लाईक करते.... दुसऱ्या दिवशी दी तो बाहेर येण्याची वाट बघत खिडकी जवळ उभी होती..... तो गेटच्या बाहेर पडतात तिने मला आवाज दिला... ती मला सांगत होती तो बघ बघतेय ना I love her यार सिस्टर..... माझ्या डोळयातले अश्रू लपवत तिच्या समोर मी चेहऱ्यावर खोट खोट हसू आणत म्हणाली छान आहे दी! आम्ही दोघीही आशुतोषवर प्रेम करत होतो..."

आशुतोष म्हणाला,

“ओहहहहह यार पण तुझ्या सिस्टरने मला Twins सिस्टर आहे हे कधीच नाही सांगितलं....”

“तिने का नाही सांगितलं माहिती नाही मला... ती तुम्हाला भेटायला पण यायची तिला तिचं प्रेम मिळालं ती तुमच्यावर प्रेम करते हे मला माहिती होताच मी तुमचा विचार मनातून काढून टाकला.... दिदी सोबत नियतीने जे वार करून तिला आघात दिले ते घोर संकट तिच्यावर कोसळले त्यातून तिची सुटकाही झाली नाही... जेव्हा माहिती पडलं तेव्हा सर्व काही संपलं होतं... दिदी ने शेवटी मला एक वचन मागितलं होतं... की तू आशुतोषचा आयुष्यात आराध्या बनून जा आणि माझं प्रेम त्याला दे पण तेव्हा ही मी तिला सांगू नव्हती शकली मी आशुतोषवर प्रेम करते म्हणून मला तिला दुखवायचं नव्हतं... मी दिने मागितलेल्या वचनावर काही बोलणारच ऐवढ्यात आशुतोष तुम्ही आल्याची खबर मला दिच्या मैत्रीणीने दिली आणि मी तिथून तुम्हाला न दिसता निघून गेली..... दिदी सोबत तीच माझी शेवटची भेट होती... त्यानंतर दिदी जग सोडून......”

एवढं बोलताच आशनाच्या डोळयातून अश्रु ओघळू लागले.... श्री तिला समजावत होता. आशुतोष तिथून उठून जात आपल्या डोळयातले अश्रू खिशातली रूमाल काढून पुसत होता.... तेव्हाच पराग तिथून उठला... आशुतोषला सॉरी म्हणतं त्याने आलिंगन दिले.. त्या दोघांना श्री कॉफीटेबलवर घेऊन आला... आशना म्हणाली,

“मला खरं जे सांगायचं होतं ते मी सांगितलं. आता मी इथून जाऊ शकते परत मला तुम्ही डिस्ट्रब नका करू.... मी दिदीचा आणि माझा सोबतचा फोटो ही दाखवते तुम्हाला..”

असं म्हणतं तिने दोन आराध्या सोबतचे त्यांना फोटो दाखवले त्या फोटोवरून आराध्या कोण आणि आशना कोण हे त्यांना ओळखताच नाही आले... म्हणजे आराध्या आणि आशना ह्या दोन Twin's sister होत्या हे त्यांचा लक्षात आले...

सर्व रियालिटी जाणून घेतल्यानंतर श्री आणि आशूतोष बैंगलोरला जायला निघाले.....

प्रवासात दोघही मागचं झालं गेलं सर्व विसरून बोलत होते.... पण श्री ला रहावलं नाही म्हणून तो आशुतोषला विचारता झाला...

“आशा, अरे ती डॉ. आशना तुझ्यावर प्रेम करतो म्हणाली ना! ती आताही तुझ्यावर प्रेम करत असेल का? अजून तर लग्नही नाही केले तिने.... तुला काय वाटतं??”

आशुतोषला ही विचारच आला...

“अरे यार हो तू तिला विचारून बघायला पाहिजे होतं तिच्या मनात अजूनही मी आहे का म्हणून. ती जेव्हा आली माझ्यासमोर तेव्हा आणि मागे कार मध्ये

माझ्या सोबत बसली होती मला असं वाटतं ती कोणी आशना नसून माझी आराध्याच आहे.... पण श्री तुला एक सांगू मी प्रेम हिच्यावर नाही रे हिच्या बहिणीवर केलं होतं आता आराध्या आणि आशना दोघी जुळ्या ह्याच्या आवडीपण जुळया असेल तर आपण काय करू शकतो??"

श्री हसतच म्हणाला, "हो ना यार आणि आराध्या ऐवजी तुझ्या कॉलेज मध्ये आशना असती तिच्या जागी तर तू काय केलं असतं??"

आशुतोष बुचकळयात पोहायला लागला होता आता....

"अरे श्री नको कोड्यात टाकू मला.... प्रपोज तर आराध्याने केले होते!"

रात्री श्री आणि आशुतोष बैंगलोरला पोहचले.... श्रीने ड्रायवरला त्याला घ्यायला बोलवले. मग आशुतोषला घरी सोडून दिले....

श्री ला आत ये म्हणून आशुतोष खुप विनवू लागला नाईलाजाने त्याला जावं लागलं.... ऋतुजा काय म्हणेलं मला बघून ह्याचं भितीने तो घरात पाय ठेवायला नकार देतं होतं पण आशुतोष समोर त्याचा नकार काही टिकला नाही....

घरची सर्व मंडळी हॉल मध्ये बसली होती... आशुतोषने श्री माझा एमबीबीएस ला रूममेटस आणि बेस्ट फ्रेन्ड होता असं सांगत सर्वांसोबत परिचय करून दिला....

ऋतुजाही तिथेच उभी होती..... आशुतोष हसतचं आपल्या पापानां म्हणाला, “पण बरं का पपा हा माझा मित्र माझ्यापेक्षा वयाने दोन वर्षलहान आहे. श्रीच बीई, बीटेक झालं आहे दिल्ली युनिवरसिटीतून....”

श्रीचे पपा म्हणाले, “अरे वा बेटा आता काय करतो मग...”

श्रीने लाजतच उत्तर दिले,”आता पपाचे ऑफीस बघतो.... त्यांचा बिझनेस सांभाळतो.”

श्री च्या वडीलाचं नाव ऐकताच आशुतोषचे पपा म्हणाले, “तुझ्या वडीलाचं तर ह्या शहरात नाव आहे त्यांना कोण नाही ओळखत नशिब आमचं आमच्या चिरंजीवाचा मैत्रीतून तुमच्या सोबत भेटीचा योग आला....”

श्रीला ते काही बोलूच देत नव्हते तसे त्याचे बोलणे संपते की नाही तर आशुतोष च्या आई म्हणाल्या, “अरे बेटा तू आशुतोष पेक्षा दोन वर्षांनी लहान आहे ना! म्हणजे तू आमच्या ऋतुजाच्या वयाचा नक्कीच असणारं...”

श्री चोरून ऋतुजाकडे बघत होता मानेनेच त्यांने होकार दिला... आशुतोषने ऋतुजाला त्याच्यासाठी जेवणाचं ताट वाढायला सांगितले... आणि आशुतोष श्रीला म्हणाला, “श्री चल रे जेवण करूनच जा आता....”

श्रीने आशुतोष सोबत जेवण केलं आणि निघून गेला.....

तो गेल्यावर आशुतोष ऋतुजा सर्व फॅमिली एकत्र बसली होती तेव्हा आशुतोषची आई म्हणाल्या, “किती छान आहे रे तुझा मित्र खुप संस्कारी वाटतो.... तुला तर त्याचा स्वभाव माहिती असेल ना

तुझा बेस्ट फ्रेंन्ड म्हटल्यावर?? आणि तो आपल्या ऋतुजाच्याच वयाचा आहे म्हणतो तर आपल्या ऋतुजासाठी कसा वाटेल??”

ह्यावर आशुतोष म्हणाला, “आई तू पण ना ग तो किती रिच आहे आपल्या पेक्षा आपण कुठे तो कुठे?? सोड हा विषय.....” असं म्हणत तो तिथून उठून झोपायला आपल्या बेडरूम मध्ये निघून गेला....

भाग - १५

श्री घरी आला. आशुतोष कडून जेवण केलंच होतं त्याने. त्याला वाटलं ऋतुजाला कॉल करावा. पण रात्री त्यांनी तिला कॉल नव्हता केला. बेडवर येऊन श्री लवडला... मँसेज रीग वाजली

हं आता कुणाचा मँसेज असावा म्हणून त्याने फोन हातात घेतला हे समजून की ऋतुजाचा मेसेज असावा. पण ऋतुजा मँसेज नसून आशुतोषचा मँसेज होता,"गुड नाईट मेरे यार..."

आशुतोषलाही त्याने गुडनाईट म्हणून रिपले केला....

ही ऋतुजा मला आता स्वतःहून मेसेज करणारचं नाही का? राग आला असावा तिला आपला मी स्वतः च मेसज करतो म्हणून तिला त्याने Hii चा मेसेज केला... ती झोपली नव्हतीच तिनेही त्याने hii म्हटलं म्हणून hii असाचं मँसेज केला... श्रीला वाटलं आता तरी खुप रागवली आहे आपल्यावर मँसेज वर नाहीच ऐकणार म्हणून तो तिला एक मँसेज करतो.... मी तुला कॉल करतो रिसिव्ह कर कोणी असतील आजुबाजूला तर बोलू नको फक्त ऐक... आणि मँसेज सेन्ड करून तिला कॉल करतो.

"ऋतुजा आय ल्व यु सो मच. आजसे नही पुरे १४साल से..."बापरे! त्याचा तोंडून आय ल्व यू शब्द ऐकून ऋतुजा तर एवढी आनंदीत झाली.... तिला हा आनंद कसा व्यक्त करावं सुचतं नव्हतं...

“म्हणजे श्री तू माझ्यावर चौदा वर्षा पासून कसा प्रेम करतो रे?”

श्री ने तिच्या नकळत तिच्या स्कूल लाईफ पासून प्रेम केलं आजही तो तिच्यावरच प्रेम करायचा....

तिला हे जरा उशिराच समजलं.

“अगं ऋतुजा मी पाचवी सहावीपासूनच तुझ्या प्रेमात होतो तुला चोरून बघायचो वर्गात.... पण मी तुझ्यावर प्रेम करतो हे सांगायची हिंमत नाही झाली आणि तेव्हापासून माझ्या ह्रदयात तुझीच जागा आहे”

हसतच ऋतुजा त्याला म्हणाली,“ओहहहह छुपे रूसतम निकले आप तो इतने दिनोसे चोरी छुपे हमे देखते आये... क्या बात है!”

“बस करो ना यार अभी कल मिलते है!”

“आय ल्व यू टू श्री... थँक्यू सो मच यार!”

श्री ने विचारलं “थँक्स कशासाठी?”

ऋतुजा हसतच म्हणाली,

“प्रपोजल एक्सेप्ट केलं त्यासाठी.....” आणि फोन कट केला तिने....

श्री ही गालातच हसला...

भाग - १६

आशुतोष अधून मधून श्रीला कॉल करत असायचा.... आजही दोघांची मैत्री घट्टच होती....! ! काही गैरसमजूतीमुळे त्याच्यातजो दुरावा आला तो प्रत्यक्षात भेटल्यानंतर नाहीसा झाला... ऋतुजा आणि श्रीचा प्रेमाबद्दल आशुतोषला साधी मनकही नव्हती लागली पण एक दिवस ऋतुजा घरी उशिरा आली... आणि त्याच रात्री सात वाजता आशुतोषला ती श्री सोबत कॉफीशॉपवर दिसली आशुतोष तिथून घरी निघून आला आणि ऋतुजा घरी येण्याची वाट बघू लागला...

त्यांनी ही गोष्ट घरात कुणालाच नाही सांगितली नऊ वाजता ऋतुजा घरी आली.. आणि आपल्या रूम मध्ये जाऊन बसली...

आशुतोष तिच्या रूम मध्ये गेला....

“ऋतुजा, काय म्हणतो श्री?”

आशुतोष असं डायरेक्ट श्री बद्दल विचारतोय हे ऐकून ती घाबरलीच.....

“कक् काय दादा.....” जरा घाबरतच ती प्रतिउत्तर देते.

आशुतोष तिच्या समोर बसतो..... आणि तिच्या खांद्यावर हात ठेऊन म्हणतो, “अगं ऐ ऋतू भावापासून लपवायला लागली का आता तू ऐवढी मोठी झालीस मला सांगू पण नाही शकत.. आज बघितलं मी तुला श्री सोबत तसं श्री माझा बेस्ट फ्रेन्ड आहे पण तुमच्यात प्रेम प्रकरण कधी पासून??”

दादा आपल्या प्रेमाला विरोध करणार म्हणून ती धास्तावलेलीच होती तरी तिने सर्व काही खरं खरं सांगून दिलं आणि म्हणाली..... “ये दादा सॉरी तुला माझा राग आला का? तू म्हणशील त्याचं मुलाशी मी लग्न करील रे. पण मी श्री वर खुप प्रेम करते मीच त्याला प्रपोज केलं होतं तू प्लिज रागवू नको ना!”

आशुतोष जरा रागातच बघत तिला म्हणाला, “त्याच्या सोबत प्रेम केलं आणि मला तू सांगितलं देखील नाही.... उद्या पप्पांना सांगते मी हे सर्व थांब तू आणि ऐक....”

डोळ्यात पाणी आणतच ती म्हणाली,

“दादा तू म्हणशील ते करील रे प्लिज पप्पाना नको सांगू ना..... '

आशुतोष परत रागात म्हणाला,

“माझी ऐक शर्त तुला ऐका लागेल.....”

ती म्हणाली,

“हं बोल दादा......”

आशुतोष तिचा हात हातात घेत म्हणाला,

“ऋते तुला श्री सोबतच लग्न करा लागेल..... ही माझी शर्त...”

डोळयात तिच्या आनंद अश्रू ओघळायला लागले....

“थँक्यू दादा.....” म्हणत तिने त्याला मिठ्ठी मारली....

“दादा मला वाटलं तू विरोध करणार माझ्या प्रेमाला......”

ह्यावर आशुतोष म्हणाला,

“प्रेम तू करते त्याच्यावर. मी भाऊ झालो तुझा म्हणून तुमच्या प्रेमाच्या आड यायला कोण गं! विरोधाभासापेक्षा तुमचं प्रेम श्रेष्ठ असतं.....”

भाग - १७

श्री आणि ऋतुजाच्या प्रेमचर्चा आता घरातही दोघांच्या माहिती झाल्या विरोध नव्हताच त्यांच्या प्रेमाला.....

गंधर्व विवाह करण्याची इच्छा ऋतुजाला आधी पासून होती तिच्या स्वप्नातला राजकुमार तिला आता आपल्या महलात काही दिवसांनी घेऊन जाणार होताच.... तद् पुर्वी आशुतोषचं लग्न करण्याची घरच्यांची इच्छा होती... आशुतोषच्या वडिलांनी आपल्या एका मित्राला शब्द देऊन ठेवला होता.... तुझ्या दोन मुलीतून एक मुलगी मी आशुतोषसाठी मागणी घालणार म्हणून.... आणि त्याला आशुतोषही वडीलाच्या मर्जीपलीकडे जाऊन विरोध नव्हता दर्शवू शकत.... आशुतोषला लग्न करायचं नव्हतचं लग्न करण त्याच्या मनातही नव्हतं.... पण वडीलासमोर त्याचं काय चालणार.... आईने त्याला मुलीचा लिफाफ्यात फोटो दिला आणि म्हटलं, “आशु बेटा बघ मुलगी छान आहे... दिसायला पण. डॉक्टर आहे तुम्ही दोघं मिळून क्लिनिक चालवू शकता....”

आशुतोष ऐकत होता तिकडून त्यांचे पप्पा आले ते म्हणाले,

“बेटे आशुतोष मेरे बचपन का वो जिगरी दोस्त है अब दिल्ली मैं रहता खुदका मकान है उनका दिल्लीमें. और यहां भी. भाई अब एकही लडकी है उनकी कल वो सब तेरा ही होने वाला है हमारे पास भी क्या कमी है!”

आशुतोष काहीच न बोलता तो फोटो घेऊन आपल्या रूम मध्ये गेला.... फोटो टेबलावर ठेऊन दिला त्यांने दोन तीन तासाने रूमच्या बाहेर आला तेव्हा आईने त्याला विचारले....

"आशु कशी वाटली मुलगी आवडली ना!"

आशुतोषने फोटो बघितलाही नव्हता फोटो न बघताच तो बाहेर आल्यावर आईच्या बोलण्यावर म्हणाला, "छान आहे मुलगी...."

तो आई पासून सुटकारा मिळवण्यासाठी तिथून लवकर जायला निघाला तरी आईने त्याला थांबवून शब्द बंधनात अडकवलेच आणि हळूच म्हणाल्या, "आज ज्याचं आहे बेटा रात्री आपल्याला मुलीकडे....."

आशुतोष  ठिक आहे म्हणून निघून गेला.....

भाग - १८

रात्री सहा वाजता आशुतोषचे आई बाबा तो सोबत ऋतुजाही होतीच सर्व मुलीच्या घरी गेले....

आशुतोषला तर वडिलाचं कटपुतली बनून ते सांगतात तसं ऐकत होता. त्यांच्या मर्जीसाठी तो तिथे गेला..... बैठकीत मुलगी ट्रे घेऊन यायच्या आधीच तिच्या आणि आशुतोषच्या लग्नाचा विषय निघाला.... आशुतोषला तिटकारा वाटत होता तिथे गेल्याचा.

ऋतुजा तिथून उठली आणि किचन मध्ये गेली.... तिथे मुलीची आई होती...

तिथे जाताच ऋतुजा म्हणाली, “नमस्कार काकू वहिनीसाहेब कुठे आहेत आमच्या तयार झाल्या नाहीत का अजून.....”

मुलीची आई ऋतुजाला म्हणाली,

“बेटा आहे ती रूम मध्ये झालीच तयार घेऊन जा ना तुझ्या वहिनीला बैठकीत.....”

ऋतुजा मुलीच्या रूममध्ये गेली... तिचा स्वभाव ऋतुजाला फार आवडला अर्धातासातच दोघी जणू मैत्रिणी झाल्या. बैठकीत जाताना ती ऋतुजाला म्हणाली माझं लग्न करण्याची इच्छा नाही पण, बाबांनी तुमच्या बाबांना शब्द देऊन ठेवला होता आणि बाबाच्या मतापलीकडे ह्या घरात काहीच चालत नाही...”

ऋतुजाला ही ऐकून जरा वाईटच वाटलं....

मुलगी बैठकीत आली तरी आशुतोष वर मान करून मुलीकडे बघायला तयार नव्हता. ती बैठकीत आली तेव्हा.... आशुतोषला थंड गारवा अंगारा भेदून गेल्याचा भास झाला जणूकाही त्यांची आराध्या तिथे येऊन गेली असावी....

मुलीला मध्यस्ती म्हणून एकाने प्रश्न विचारायला सुरूवात केली... सर्व प्रथम त्यांनी नाव विचारलं "तुझं नाव काय?"

तिने उत्तर दिलं..... "आशना....."

हे नाव ऐकताच आशुतोषने वर मान केली तो तिच्याकडे बघू लागला. ती तिच होती.... डॉ. आशना. आराध्याची बहिण आशना..... आशुतोषला तिच्यात गुलाबी रंगाच्या साडीवर त्यांची आशना दृष्टिस पडत होती ह्याच साडीत आशुतोषने कॉलेज प्रोग्राम मध्ये आराध्याला पाहिले होते ते आराध्याचे फोटो आजही आशुतोषच्या फोनमध्ये सेव होते..... सेम आराध्या दिसत होती ती फरकच काय होता त्याच्याच!

भाग - १९

बैठक झाल्यानंतर दोघांनाही ऋतुजा ऐकांतात बोलायला घेऊन गेली.... ऋतुजा जातच होती तर आशुतोषने तिला थांबवून घेतलं.... आणि तो आशनाला म्हणाला,

“डॉ. आशना माय सिस्टर ऋतुजा.... आणि ऋतुजा त्या रात्री श्री सोबत दिल्लीला मी ह्यांनाच भेटायला गेलतो.......”

ऋतुजाला आधीच श्रीने सर्व सांगितलं होतं हे आशुतोषला ही माहिती होतं.....

“दादा म्हणजे ह्या आराध्याची सिस्टर आशना आहेत??”

ऋतुजा ही आता चकित झाली हे काय घडत आहे.... आपल्या भावासोबत म्हणून आशुतोष म्हणाला....

“हो ऋतुजा.....”

आशनाचा लग्नाला आधीच विरोध होता आणि आशुतोषचा ही..... पण ऋतुजा त्यांना म्हणाली,

“दादा तुझा घरूनच लग्नाला विरोध ह्यांना ( आशना ) ही लग्न नाहीच करायचं म्हणे.... पण दादा ऐक ना आराध्या नाही आहेत. पण तू आशनाजी मध्ये

तुझ्या आराध्याला शोध... आशनाजी पण तुझ्यावर प्रेम करायच्याच ना मला श्री ने सांगितलं दादा..... तुम्ही ठरवा आता काय ते...."

म्हणून ती तिथून त्या दोघांना ऐकातात सोडून तिथून बैठकीत गेली....

काय बोलावं आशुतोषला ही सुचतं नव्हतं आणि आशनालाही नाही आशुतोष जेव्हा आपली नजर तिच्यावर रोखून बघायचा तर त्याला तिच आराध्या त्याच्यात दिसायची तो तिला म्हणाला,

"एक बोलू तुमच्यात आजही माझी आराध्या जिवंत आहे..... जेव्हा तुमच्याकडे बघतो तेव्हा मला असं जाणवतं तीच माझ्या समोर आहे तिचा मृत्यू झाला ती हे जग सोडून गेली हे स्वप्न वाटतं जेव्हा मी डॉ. आशना तुमच्याकडे बघतो......"

तेव्हा ती म्हणाली,

"मी तुमच्यावर आजही प्रेम करते हं तेवढच माझी दिदी करायची कदाचित आमच्या दोघीला एकाचं आशुतोषवर एकाच दिवशी प्रेम झाले होते.... तुम्हाला एक प्रश्न विचारू?"

आशुतोष म्हणाला,

"हो विचारा....."

"आराध्या म्हणून माझा स्विकार करणार का?"

आशुतोषच्या चेहऱ्यावरचं हास्य तिने वापस आणलं होतं..... आशुतोष तिला बोलला..

“काय म्हटलं प्लिज परत एकदा म्हणा....”

तिने परत तेच वाक्य बोललं..

“आराध्या म्हणून माझा स्विकार करणार का?”

तो सौम्य स्वरात तिला म्हणाला,

“तुम्हाला मी आराध्या म्हटलेलं आवडेल का?”

तिने मानेनच होकारं दिला....

दोघही रूमच्या बाहेर पडले.... बैठकीत येऊन आशुतोषने सांगितले.....

“मला मुलगी पंसद आहे......”

--------------------------------------

आशुतोष आणि आशना ह्याचं लग्न तर थाटामाटात रितीरिवाजा नुसारं पार पडलं.....

*********

श्री आणि ऋतुजाचंही लग्न झालं आपल्या आपल्या संसारात सर्व रममाण झाले....

पण नियतीने त्या रात्री श्री वर वार केला......

ऋतुजा श्री चा बाळाला जन्म देणारं होती. श्रीचं आठ महिन्याचं मुल तिच्या उदरात वाढत होतं.

नियतिला त्यांच्या सुखी संसारात विर्जण घालायचचं होतं....

नियती आपले डाव कशी मुकणार?.... श्री त्या दिवशी ऑफीसच काम पुर्ण करून रात्री दहा वाजता घरी जायला निघाला.... वाटेत ट्राफीक जाम आहे म्हणून कोणी तरी त्याला कॉल केला की शहरात नकाबंदी आहे....

त्याने कार दुसऱ्यामार्गाने काढली..... पावसाळ्याचे दिवस होते... खुप चिखल साचलेला होता. काचावरून सरीचा धारा ओघळत होत्या..... समोरचं श्री ला दिसेनास झालं.... ऋतुजा घरी त्याची वाट बघत बसली होती. श्रीच पुर्ण मन ऋतुजात होतं. तिला कधी जाऊन भेटतो असं ऑफीस सुटल्यानंतर त्याला रोज वाटे. आज सारखं त्याचं मन ऋतुजाकडे वेध घेतं होतं....

त्या मार्गाने भरवेगात एक मेट्याडोर आला श्री ला ही त्या मुसळधार पाऊसात ट्रर्निंग समजलं नाही.

मेट्याडोरने ही जोराची धडक दिली....

विल वरून त्याचा हात घसरला आणि कार सुसाट वेगाने एका झाडावर जाऊन आदळली....

कारच्या काचा श्री च्या डोक्यात खुपसल्या रक्तबंबाळ देह झाला होता.... रात्रभर ऋतुजा त्याला कॉल करतच राहली पण काहीच प्रतिसाद नव्हता येत. तिचा श्री कार अपघातात जागीच ठार झाला होता...

ही बातमी ऋतुजाला दुसऱ्या दिवशी समजली.... श्री चा मृत्यूदेह घरात पडून होता. ऋतुजाला प्रत्येक लहान मोठ्या दुखातून बाहेर काढणारा तिचा श्री तर मरणाअवस्थेत एक लाश बनून निश्चित पडून होता...

ऋतुजाला ह्यातून सावरणेच खुप गरजेचे होते.... नियतीचे फेरे कुणाला चुकले जे व्हायचं ते घडलच...

तिथून एक महिन्यानं नव्या श्री चा जन्म झाला..... गोडस हसरा चेहरा श्रीचं रूप लाभलं होतं त्याला...

तोच आता ऋतुजाच्या जगण्याची उमेद होता.....

त्याला ऋतुजाने नाव दिलं श्री.... ती त्याला श्री म्हणूनच साद घालायची!

भाग - २०

पाऊस नेहमी पडतो गरजतो बरसतो नात्याचं ही एक वलय मृगजळात बंधिस्त

करतं..... आठवणीचे ठस्से

समुद्रकिणारी वाळूवर त्या कोरले होते...... ते ठस्से पाऊलाचे श्री आणि ऋतुजाचे!

प्रेम पुष्प नव्याने उमलते कधी श्री आणि ऋतुजाना एकत्र घेऊन येतं तर कधी... आशुतोषचं हरवलेलं प्रेम आशनात गुंतून जाते आराध्या समजून तिच्याभोवती मन घिरट्या घालते प्रेम पाखराची दुनिया अशीच अधोरेखित होते...

मेघ काळेकुट्ट एकत्र आले की प्रेम जीवांची लहर काळजात धस्स होतं सर्वांग शहारून घेते.... थेंबथेंब सरीने पापण्या ओलावून जातं मृगजळ इथेच पुर्ण होते......

( समाप्त )

**© कोमल प्रकाश मानकर**

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान